www.rajdand.com
पुणे, रविवार
19.02.2023
पृष्ठ : ४ । मूल्य : ₹ ४.०० । माघ कृ.१४
/rajdandlive
Declaration No. : SDM/SR/07/2023

मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
स्थापना १९९९
मुख्य संपादक : राही भिडे



आपण दिवाळखोर झालो आहोत, आता आयएमएफही आपल्याला वाचवू शकत नाही

पान ४ वर..

## उद्धव ठाकरेंच्या आमदारांवर टांगती तलवार : अर्थसंकल्पीय अधिवेशनासाठी शिंदे बजावणार व्हीप

### पालन न केल्यास आमदारकी होणार रद्द

**मुंबई : वृत्तसंस्था**

**उद्धव ठाकरे यांच्या मागे लागलेले लचांड काही केल्या कमी होताना दिसत नाही. निवडणूक आयोगाच्या निर्णयानंतर आता ठाकरे गटाच्या आमदारांची कोंडी होणार आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनासाठी ठाकरे गटातील आमदारांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा व्हीप लागू होणार आहे, तो जर त्यांनी पाळला नाही तर त्यांची आमदारकी जावू शकते, असा दावा औरंगाबादचे शिवसेना आमदार संजय शिरसाट यांनी केला आहे.**



शिवसेनेचा व्हीप ठाकरे गटाच्या आमदारांना पाळावा लागणार आहे. व्हीप न पाळल्यास ठाकरे गटाच्या आमदारांवर अपात्रतेची टांगती तलवार असणार आहे. निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्णयानंतर एकनाथ शिंदेंना शिवसेना पक्ष आणि चिन्ह मिळाले आहे. यामुळे आता होणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आदित्य ठाकरेंनाही भरत गोगावले यांनी जारी केलेला व्हीप लागू होणार आहे.

उद्धव ठाकरे गटाकडे ४ खासदार आहेत. त्यापैकी काही आमदार आणि खासदार आमच्यासोबत असल्याचा दावा संजय शिरसाट यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना केला आहे. १४ आमदारांना अपात्र करा, अशी मागणी केल्याचेही त्यांनी सांगितले. जर व्हीपची अमंलबजावणी केली नाही, तर निलंबणाची कारवाई होणारच, असा इशारा त्यांनी दिला आहे. कोरोनात दोन वर्षे आराम केला. तो यापुढेही करावा, असा टोलाही त्यांनी उद्धव ठाकरेंना लगावला आहे.

## पाळीव कुत्र्याने भाकरीची टोपली पळवली म्हणून कुत्रा मालक होत नाही

■ संजय राऊतांचा एकनाथ शिंदेंवर हल्लाबोल



**मुंबई : वृत्तसंस्था**

पाळीव कुत्र्याने भाकरीची टोपली पळवली म्हणून कुत्रा मालक होत नाही आणि मालक भिकारी होत नाही, अशा शब्दांत ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी एकनाथ शिंदेवर हल्ला चढवला आहे.

निवडणूक आयोगाने शिवसेना हे पक्षनाव व धनुष्यबाण हे चिन्ह एकनाथ शिंदे गटाला दिले आहे. त्यावरुन आज कणकवली येथे पत्रकार परिषदेत संजय राऊतांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शिंदे गट तसेच नारायण राणेंवरही घणाघाती टीका केली.

एकनाथ शिंदेंना उद्देशून संजय राऊत म्हणाले, रावणाला धनुष्यबाण पेलवणार नाही. ते धनुष्यबाण रावणाच्या छाताडावर पडेल. शिंदे गटाचे आमदार हे आमिषाला बळी पडून बाहेर पडले आहेत. त्यामुळे शिवसेना हा पक्ष त्यांच्या मालकीचा कसा? निवडणूक आयोगाचा हा निर्णय सर्व कायदे पायदळी तुडवून दिला आहे. याविरोधात सर्व पक्षांनी एकत्र येऊन निवडणूक आयोगाला जाब विचारणे गरजेचे आहे.

शिवसेना हे नाव व धनुष्यबाण हे चिन्ह एकनाथ शिंदेंकडे गेल्यावरुन नारायण राणे यांनी आनंद व्यक्त करत काल उद्धव ठाकरेंवर टीका केली. त्यावर नारायण राणेंना उद्देशून संजय राऊत म्हणाले, शिवसेनेशी नारायण राणे यांचा काय संबंध? उगीचच बेगाने शादीमे अब्दुल्ला दिवाना झाले आहेत.

संजय राऊत म्हणाले, दिल्लीतील महाशक्तीने आधीच एकनाथ शिंदेंना पक्षनाव व धनुष्यबाण देण्याचे वचन दिले होते. दिल्लीतच हे कटकारस्थान ठरले होते. त्यानुसार निवडणूक आयोगाचा गळा दाबून शिंदे गटाला धनुष्यबाण व शिवसेना हे पक्षनाव देण्यात आले आहे.

### ठाकरेंना निवडणूक आयोगाचा अजून एक धक्का

## कसबा – चिंचवड पोटनिवडणुकीपर्यंतच पक्षाचे नाव अन् मशाल चिन्ह वापरता येणार

**मुंबई : वृत्तसंस्था**

शिवसेनेत एकनाथ शिंदे यांनी बंड केल्यानंतर उद्धव ठाकरे यांना जोरदार धक्का बसला. त्यानंतर आता निवडणूक आयोगानेही धक्क्यामागून धक्के देणे सुरू केले आहे. त्यात पहिला धक्का शिवसेना हे नाव आणि धनुष्यबाण हे चिन्ह शिंदे गटाला देऊन दिला. तर आता दुसरा धक्का म्हणजे उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना हे नाव आणि मशाल हे चिन्ह सुद्धा कसबा आणि चिंचवड पोटनिवडणुकीपुरतेच वापरता येणार आहे. त्यामुळे पुढे काय, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

उद्धव ठाकरे यांच्यामागे लागलेले शुक्लकाष्ठ काही केल्या संपताना दिसत नाही. निवडणूक आयोगाच्या या निर्णयानंतर आता समता पक्षानेही निवडणूक आयोगाकडे धाव घेत मशाल चिन्ह आपल्याला द्यावे, अशी मागणी केली आहे.

शिवसेनेमध्ये एकनाथ शिंदे यांनी बंड केले. त्यानंतर रमेश लटके यांच्या निधनामुळे अंधेरीची पोटनिवडणूक झाली. त्यावेळी शिंदे गटाने आम्हीच खरी शिवसेना म्हणत धनुष्यबाणावर दावा केला. तेव्हा निवडणूक आयोगाने चिन्ह गोठवले. ठाकरे गटाला मशाल आणि शिंदे गटाला ढाल-तलवार चिन्ह दिले. आता कसबा आणि चिंचवड पोटनिवडणुकीसाठीही हेच चिन्ह वापरण्याची मुभा मिळाली होती.

शिवसेना हे नाव आणि धनुष्यबाण हे चिन्ह निवडणूक आयोगाने एकनाथ शिंदे यांना देण्याचा निर्णय घेतला. आता निवडणूक आयोगाने ठाकरे गटाला अजून एक धक्का दिला आहे. त्यानुसार शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे हे पक्षाचे नाव आणि मशाल हे निवडणूक चिन्ह फक्त चिंचवड आणि कसबा पोटनिवडणुकीपर्यंतच म्हणजेच २६ फेब्रुवारीपर्यंत वापरता येणार आहे. निवडणूक आयोगाने तशी ऑर्डरच काढल्याचे समजते. त्यामुळे ठाकरे गटाची पुन्हा एकदा कोंडी झाली आहे.

समता पक्षानेही मशाल हे चिन्ह आपल्याला द्यावे, अशी मागणी निवडणूक आयोगाकडे केली आहे. पक्षाचे राष्ट्रीय महासचिव कैलास झा यांनी निवडणूक आयोगाला एक पत्र पाठवले आहे. त्यात त्यांनी निवडणूक आयोगाने काल निकाल दिला. त्यामुळे आता आमचे मशाल चिन्ह आम्हाला द्यावे, असे म्हटले आहे. यावर निवडणूक आयोग काय निर्णय घेणार, हे पाहावे लागेल.

निवडणूक आयोगाच्या निर्णयाविरोधात उद्धव ठाकरे सर्वोच्च न्यायालयात जाण्याची शक्यता आहे. मशाल हे चिन्ह आणि सध्याचे उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना हे नाव कायम ठेवावे, अशी मागणी ते करण्याची शक्यता वर्तवली जात आहे. ठाकरे यांनी आज पक्षाची महत्त्वाची बैठक बोलावली आहे. त्यात यावर निर्णय होऊ शकतो.

## राहुल कलाटे यांना 'वंचित'चा पाठिंबा; महाविकास आघाडीच्या अडचणीत भर

**चिंचवड : प्रतिनिधी**

चिंचवड विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीत वंचित बहुजन आघाडीने शिवसेनेचे बंडखोर उमेदवार राहुल कलाटे यांना पाठिंबा जाहीर केला आहे. शिवसेना ठाकरे गटाची युती असलेल्या वंचितच्या या निर्णयामुळे महाविकास आघाडीच्या अडचणींमध्ये भर पडणार आहे.

वंचित बहुजन आघाडीच्या व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे झालेल्या राज्यस्तरीय बैठकीत चिंचवड मतदार संघात कलाटे यांना पाठिंबा देण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती पक्षाच्या प्रदेशाध्यक्ष रेखा ठाकूर यांनी दिली. कसबा मतदारसंघात मात्र काँग्रेस कडून पाठिंबा मिळावा अशी मागणी न आल्याने त्याबाबत कोणताही निर्णय घेण्यात आला नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

चिंचवड मतदार संघात भारतीय जनता पक्षाचे दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या पत्नी अश्विनी जगताप या भाजप, शिवसेना शिंदे गट आणि रिपब्लिकन पक्ष आठवले गट युतीकडून निवडणूक लढवत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे नाना काटे यांना महाविकास आघाडीने उमेदवारी दिली आहे. महापालिकेतील शिवसेनेचे गटनेते राहुल कलाटे यांनी बंडखोरी करून अपक्ष उमेदवार म्हणून रिंगणात उडी घेतली आहे. त्यांना वंचितचा पाठिंबा मिळाल्यामुळे महाविकास आघाडीच्या गोटात अस्वस्थता आहे.

## ...म्हणून अशोक चव्हाणांनी करावा भाजपाचा विचार

राधाकृष्ण विखे पाटील यांचे खुले निमंत्रण

**अहमदनगर : प्रतिनिधी**

एकीकडे काँग्रेसला कोणतेही भवितव्य राहिलेले दिसत नाही तर दुसरीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नेतृत्व संपूर्ण जगाने मान्य केले आहे. या पार्श्वभूमीवर अशोक चव्हाण यांच्यासारख्या नेत्यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश करण्याचा जरूर विचार करावा, अशा शब्दात भाजपा नेते आणि माजी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी चव्हाण यांना खुले निमंत्रण दिले आहे.

काँग्रेस पक्ष लयाला गेला आहे. या पक्षाला कोणतेही राजकीय भवितव्य राहिलेले नाही. या पार्श्वभूमीवर अशोक चव्हाण यांनी भाजपचा विचार करावा. चव्हाण यांनी लोकप्रतिनिधी म्हणून चांगले काम केले आहे. कार्यक्षम मंत्री आणि मुख्यमंत्री म्हणून त्यांचा लौकिक आहे. त्यामुळे स्वतःच्या भवितव्याचा विचार करून त्यांनी भाजपमध्ये यावे, असे आवाहन विखे पाटील यांनी केले.

## निवडणूक आयुक्त हे पंतप्रधानांचे गुलाम : उद्धव ठाकरे



**मुंबई : वृत्तसंस्था**

उद्धव ठाकरे यांनी मुंबईतील कलानगर येथे ओपन जिपमधून कार्यकर्त्यांशी संवाद साधला. विशेष म्हणजे बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेनेची स्थापना केली तेव्हाही त्यांनी सुरुवातीच्या दिवसांमद्ये गाडीच्या टपावरुन भाषण केले होते. अगदी त्याच पद्धतीने संवाद साधत उद्धव ठाकरेंनी शिवसैनिकांत चैतन्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला. यावेळी त्यांनी शिंदे गटासह पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्य निवडणूक आयुक्तांवरही जोरदार प्रहार केले.

उद्धव ठाकरे म्हणाले की, गद्दारांना निवडणुकीत गाडल्याशिवाय स्वस्थ बसायचे नाही. चोरांना धडा शिकवणारच. ज्यांनी शिवसेनेकडून नाव, धनुष्यबाण चोरलंय, त्यांनी माहिती नाही की, त्यांनी मधमाशीच्या पोळ्यावर हात मारलाय. या मधमाशीचा चावा काय असतो, हे लवकरच त्यांना कळेल. सरकारी यंत्रणा भाजपच्या गुलाम झाल्या आहेत. निवडणूक आयुक्तही गुलाम झाले आहेत. गुलाम झालेल्या यंत्रणा अंगावर सोडून शिवसेना संपवणे शक्य होणार नाही. निवडणूक आयुक्त निवृत्त झाल्यावर राज्यपाल होऊ शकतील. असे गुलाम भाजपने पाळलेत. मात्र, माझे या गुलामाला आव्हान आहे, ते शिवसेना कुणाची?, हे ठरवू शकत नाहीत. गद्दारांना आज केवळ शिवसेना नाव हवय, बाळासाहेब ठाकरेंचं नाव हव आहे. पण, शिवसेनेच कुटुंब नकोय.

एक दिवस असा होता जेव्हा मोदींचे मुखवटे घालून प्रचार केला जायचा. मात्र, आज मोदींना बाळासाहेब ठाकरेंचा मुखवटा घालून यावे लागत आहे. आज महाराष्ट्रात मोदी चालत नाही. मोदींच्या नावावर आज महाराष्ट्रात मते मिळत नाहीत. हा महाराष्ट्राचा विजय आहे. रावणानेही शिवधनुष्य उचलण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, काय झालं? रावण उताणा पडला. आता ज्या चोरांनी शिवधनुष्य चोरलेय. ते देखील उताणे पडल्याशिवाय राहणार नाही. शिवसेनेविरोधात केवळ कटकारस्थाने चालू आहेत. उद्या आपले मशाल हे निवडणूक चिन्ह देखील ते गोठवू शकतात. लढाई आता सुरू झालीये. ही चोरी आपण त्यांना पचू द्यायची नाहीये. तुम्ही शिवधनुष्य घेऊन या, मी मशाल घेऊन येईल. हिंमत असेल तर निवडणुकीत समोरासमोर या, असे आव्हान उद्धव ठाकरेंनी दिले. तसेच, शिवसैनिकांनो आजपासून निवडणुकीच्या तयारीला लागा, असे आदेश दिले.

शिवसैनिकांना उद्देशून उद्धव ठाकरे म्हणाले, मी खचलेलो नाही. कारण शिवसैनिक माझ्यासोबत आहेत. या गद्दारांच्या छाताडावर आपल्याला शिवसेनेचा भगवा फडकावयचा आहे. उद्या फेसबूक लाईव्ह घेऊन मी निवडणूक आयोगासमोर आपण काय-काय मांडले, निवडणूक आयोगाने कसा पक्षपाती निर्णय दिला, याची माहिती देणार आहे.

तत्पूर्वी मातोश्रीसमोर उद्धव ठाकरेंनी शिवसैनिकांशी संवाद साधला. यावेळी उद्धव ठाकरे म्हणाले, महाशिवरात्रीच्या दिवशी शिवसेनेचे धनुष्यबाण चोरीला गेले आहेत. त्या चोराला आम्ही पकडले आहे. त्याला धडा शिकवल्याशिवाय आम्ही राहणार नाही. मी तुम्हाला आव्हान देतो की तुमच्यात हिंमत असेल तर निवडणुकीत समोर या. तुम्ही धनुष्यबाण घेऊन या, आम्ही मशाल घेऊन येऊ. मातोश्रीबाहेर जमलेल्या शिवसैनिकांसमोर उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि भाजपला आव्हान दिले.

शिवसेना फक्त नाव नाही. शिवसेना फक्त धनुष्यबाण नाही. भले त्यांनी आमचे धनुष्यबाण चोरले असतील. पण आजही लाखो शिवसैनिक माझ्या पाठिशी आहेत. असे म्हणत उद्धव ठाकरे यांनी शिवसैनिकांना पक्षाचे नाव आणि चिन्ह चोरीला गेल्याने सावध राहण्याचे आवाहन केले. महाराष्ट्राला दिल्लीपुढे झुकवणारे बाळासाहेब ठाकरेंचे शिवसैनिक असू शकत नाहीत. अशी तिखट टीकाही उद्धव यांनी मुख्यमंत्री शिंदे यांच्यावर केली आहे. शिवसेनेचे नाव चोरले जाऊ शकते, पण 'शिवसेना' चोरता येणार नाही, असेही उद्धव ठाकरे म्हणाले.

निवडणूक आयोगाच्या निर्णयानंतर शनिवारी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या समर्थकांनी मातोश्रीबाहेर जमून शक्तिप्रदर्शन केले. दादर येथील शिवसेना भवनाजवळही शिवसैनिकांनी शक्तिप्रदर्शन करत आयोगाच्या निर्णयाविरोधात घोषणाबाजी केली. विशेष म्हणजे, आयोगाच्या निर्णयानंतर उद्धव ठाकरे यांनी खासदार, आमदार आणि पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांची बैठक भविष्यातील रणनीती ठरवण्यासाठी बोलावली आहे.

**सर्वोच्च न्यायालयात आव्हान**

मातोश्रीबाहेर शिवसैनिकांचा मोठा जमाव पाहून उद्धव ठाकरे यांनी त्यांच्यासमोर येऊन संवाद साधला. त्यांनी पुन्हा एकदा शिवसैनिकांना निराश न होण्याचे आवाहन केले आहे. निवडणूक आयोगाच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देणार असल्याचे सांगत त्यांनी शिवसैनिकांना संघर्षासाठी सज्ज राहण्याचे आवाहन केले.

**शिवसैनिक समर्थनार्थ रस्त्यावर उतरले**

उद्धव ठाकरेंच्या समर्थनार्थ बोरिवली, दहिसर, कांदिवली, मालाड, जोगेश्वरी, अंधेरीसह संपूर्ण मुंबईत शिवसैनिक रस्त्यावर उतरले आहेत. मुख्यमंत्री शिंदे गटाला पक्षाचे नाव आणि चिन्ह मिळाल्यानंतरही ते उद्धव ठाकरेंसोबतच राहणार असल्याचे शिवसैनिकांचे म्हणणे आहे. आगामी महापालिका निवडणुकीत पक्षाचे नाव आणि चिन्ह चोरणाऱ्यांना ते धडा शिकवतील.

**ठाकरे उत्तर भारतीयांची भेट घेणार**

२७ फेब्रुवारीला उद्धव ठाकरे बदललेल्या राजकीय परिस्थितीत शिवसैनिकांना मातोश्री सभागृहात मार्गदर्शन करणार आहेत. मराठी राजभाषा दिनानिमित्त पक्षातर्फे येथे एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमापूर्वी उद्या पुन्हा एकदा उद्धव ठाकरे उत्तर भारतीयांशी संवाद साधणार आहेत. माजी राज्यमंत्री रमेश दुबे यांनी उद्धव ठाकरे यांच्यासाठी अंधेरी (पूर्व) येथे उत्तर भारतीय समाजाचा कार्यक्रम आयोजित केला आहे. यापूर्वी त्यांनी गेल्या रविवारी गोरेगावमध्ये उत्तर भारतीय समाजातील लोकांची बैठक घेतली होती.

## सत्ता मिळवण्यासाठी वडिलांच्या विचारसरणीच्या विरुद्ध गेले; अमित शाहांचा ठाकरेंना टोला

**पुणे : प्रतिनिधी**

निवडणूक आयोगाने शुक्रवारी शिवसेना आणि पक्षाचे निवडणूक चिन्ह 'धनुष्यबाण' हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील गटाला दिले. त्यानंतर केंद्रीय मंत्री अमित शाह यांनी प्रतिक्रिया दिली. आज अमित शाह पुण्यात आले होते, त्यावेळी त्यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर टीकास्त्र सोडलं. सत्ता मिळवण्यासाठी वडिलांच्या विचारसरणीच्या विरुद्ध गेले, असा टोला अमित शाह यांनी उद्धव ठाकरे यांना लगावला. काल युतीला खूप मोठा विजय मिळाला, अशी प्रतिक्रियाही त्यांनी दिली.

काल युतीला खूप मोठा विजय मिळाला. शिंदेंच्या शिवसेनेला खरी शिवसेना असल्याचं सांगितलं आणि धनुष्यबाण मिळालं. स्वतःपेक्षा मोठा फोटो मोदींचा लावला आणि निवडणूक लढले, आणि मुख्यमंत्री व्हायला विरोधी पक्षाचे तळवे चाटले. जे धोका देतात त्यांना कधी सोडले नाही पाहिजे, अशी टीका अमित शाह यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर केली. इथून बाहेर पडताना मी अपील करतो, लोकसभेत महाराष्ट्रातील सगळी मते भाजप - शिवसेना युतीला पडतील, असेही शाह म्हणाले.

३७० हटवला आता काश्मीरमध्ये कुणाची दगड फेकायची पण हिंमत होत नाही. या आधी काश्मीरमध्ये रक्ताच्या नद्या व्हायच्या. पूलवामामध्ये जे झाले त्यावेळी मोदीजी काहीच बोलत नव्हते. बैठका केल्या नाहीत, आम्हाला वाटले युद्ध होईल पण त्यांनी सर्जिकल स्ट्राईक केला. मोदीजी १५-१८ तास काम करतात, भारत सर्वप्रथम व्हावा म्हणून ते काम करतात, असे अमित शाह म्हणाले.

यावेळी बोलताना अमित शाह यांनी २०२४ मध्ये होणाऱ्या लोकसभा निवडणुकीचं रणशिंग फुंकले. यावेळी त्यांनी उद्धव ठाकरेंना टोला लगावला. ते म्हणाले की, आम्ही विचारांशी बांधील आहोत, सत्ता मिळवण्यासाठी वडिलांचे विचार सोडणारे नाहीत. २०२४ निवडणूकित भाजपला कष्ट आणि पराकष्ट करत आपल्याला येणाऱ्या निवडणुकीत भाजप शिवसेना युतील सर्व जागा जिंकून आणायच्या आहेत. महाराष्ट्र सर्व जागा आपली युती जिंकणार का? असा प्रश्न उपस्थितांना विचारत जय जय जय शिवाजी,जय जय जय भवानी... असा जयघोष देत त्यांनी भाषण संपवलं.



**अमित शाह आज पुणे दौऱ्यावर आले आहेत. यावेळी त्यांनी भाजप नेते गिरीश बापट यांची भेट घेतली.**

मोदींबद्दल मी काय बोलणार? सरकार कसं स्थापन झालं मी सगळ्यांना सांगितलं नाही. आपली अर्थव्यवस्था ५ नंबरवर आली, जी २० आलं ही अभिमानाची गोष्ट आहे. बाळासाहेब सांगायचे मुख्यमंत्री व्हा, मी ३७० कलम हटवतो, राम मंदिर बंधू ... मग आम्ही केलं ते बरोबर ना? काश्मीर आपला अविभाज्य भाग आहे, हे बाळासाहेब म्हणायचे आणि अमित शहा यांनी ते इथे आणले. काही गोष्टी वेळेवर होतात. काल चांगला निर्णय आला. लोकशाहीत बहुमताला महत्त्व आहे. मी खोटं बोलत नाही, शब्द पळतो. अमित शाह यांचं वाक्य म्हणजे पत्थर की लकीर होय, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचे ऑक्सफर्ड विमानतळ येथे आगमन झाले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचे स्वागत केले.

## अमित शाहांच्या सुरक्षेत हलगर्जीपणा!

### पोलिसांच्या हाती तुरी देत तरुण थेट शिरला ताफ्यात

**पुणे : प्रतिनिधी**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे पुणे दौऱ्यावर आहेत. त्यांच्या सुरक्षा यंत्रणेकडून मोठी सुरक्षा तैनात असताना त्यांच्या ताफ्यात एक संशयित तरुण शिरला. या प्रकाराची माहिती आयबीला मिळताच टीमने हेरले आणि पुणे पोलिसांनी त्याला ताब्यात घेतलं आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार श्रीकांत शिंदे यांच्या जवळचा असल्याचे सांगून ताफ्यात शिरला होता.

सोमेश धुमाळ असं या तरुणाचं नाव आहे. हा तरुण मुख्यमंत्री आणि खासदार शिंदे यांच्याकडे असल्याचे सांगून ताफ्यात शिरला. त्याने स्थानिक पोलिसांना चकवा दिला मात्र अमित शाहंच्या ताफ्यांच्या सोबत असलेल्या पोलीस यंत्रणेला हा संशयित असल्याचं लक्षात आलं. त्यानंतर स्थानिक पोलिसांना यासंदर्भातील माहिती देण्यात आली . स्थानिक पोलिसांनी या तरुणाचा पाठलाग करत त्याला गाठलं. चतुर्शृंगी पोलीस सोमेशला पिंपरी चिंचवड पोलिसांच्या ताब्यात देत आहेत. जेडब्ल्यू मॅरेट हॉटेल मधून घेतलं या संशयिताला ताब्यात घेण्यात आलेलं आहे.

सोमेशला पुणे पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. सोमेश नेमका का ताफ्यात शिरला? तो नेमका कोणाच्या गाडीत बसला? ताफ्यात शिरुन तो नेमंकं काय करणार होता? या सगळ्याचा पोलीस तपास करत आहेत.

# फोंडशिरस ग्रामपंचायतीचे माजी सरपंच दादा रणदिवे यांना भ्रष्टाचार प्रतिबंधक विभागाकडून अटक

## ॲड. धैर्यशील पाटील यांच्या पाठपुराव्याला यश

**नातेपुते : प्रतिनिधी**

फोंडशिरस, ता. माळशिरस येथील ॲड. धैर्यशील रामदास पाटील यांनी फोंडशिरस ग्रामपंचायतीमध्ये सरपंच दादा महादेव रणदिवे, ग्रामसेवक अशोक मुकुंद धाईंजे व ग्रामपंचायत क्लार्क विजय खाशाबा बोडरे यांच्या विरोधात भ्रष्टाचार प्रतिबंधक विभाग सोलापूर यांच्याकडे तक्रार दिलेली होती. त्यावेळेस ग्रामसेवक व क्लार्क यांना अटक झालेली होती. मात्र, सरपंच दादा रणदिवे यांनी न्यायालयात धाव घेतलेली होती. माळशिरस येथील जिल्हा न्यायालयात त्यांचा जामीन अर्ज फेटाळलेला होता. सरपंच दादा रणदिवे यांनी उच्च न्यायालयात अटकपूर्व जामीनसाठी दाद मागितलेली होती. न्यायालय यांनी अंतरिम जामीन मंजूर केलेला होता. कायम जामीन मंजूर केलेला नव्हता. सदरच्या जामीनाची मुदत संपताच अँटीकरप्शन विभागाने तत्कालीन सरपंच दादा रणदिवे यांना अटक करून न्यायालयासमोर हजर केले आहे. त्यामुळे सर्वच सरपंचांनी सावधान रहावे, भ्रष्टाचार व शासकीय निधीचा अपहार कराल तर जेलमध्ये जाल, अशी या प्रकरणावरून परिस्थिती निर्माण झालेली आहे. ॲड. धैर्यशील पाटील यांच्या पाठपुराव्याला यश आलेले आहे.

तक्रारदार ॲड. धैर्यशील पाटील यांनी भ्रष्टाचार प्रतिबंधक विभाग, सोलापूर यांच्याकडे दिलेल्या तक्रारी अर्जातील हकीकत अशी की, चौकशीमध्ये उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) जिल्हा परिषद, सोलापुर यांचेकडून ग्रामपंचायत फोंडशिरसमध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत विभागीय चौकशीचा अहवाल प्राप्त करून घेतला होता. १) अशोक मुकुंद धाईजे, ग्रामसेवक २) दादा महादेव रणदिवे, सरपंच ३) विजय खाशाबा बोडरे, क्लार्क हे तिघेजण त्यावेळी ग्रामपंचायतीत कार्यरत होते.

गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माळशिरस यांचेकडुन फोंडशिरस ग्रामपंचायत येथे १३ व्या वित्त आयोगानुसार झालेल्या कामकाजाबाबत व त्यातील त्रुटींबाबत माहिती प्राप्त करून घेतली होती. मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. सोलापुर गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माळशिरस याचेकडुन आवश्यक ती कागदपत्रे प्राप्त करून घेतली आहेत. सदर प्रकरणात विस्तार अधिकारी श्री. खरात यांनी घेतलेल्या दफ्तर तपासणीमध्ये खालील नमुद मुद्याबाबत आक्षेप घेण्यात आले होते. १. १३ वा वित्त आयोग निधी मधून सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात ग्रामपंचायतीने पूर्ण केलेल्या कामाची रॉयल्टीची रक्कम रुपये १,८०,६५७/- ही भरणा केली नाही व खात्यावर शिल्लक ठेवली नाही. यावरून गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माळशिरस यांनी फोंडशिरस ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी श्री. अशोक धाईजे व फोडशिरस ग्रामपंचायतीचे सरपंच श्री. दादा रणदिवे यांना कारणे दाखवा नोटीस बजावली होती.

तदनंतर ग्रामविकास अधिकारी श्री. अशोक धाईजे व फोंडशिरस ग्रामपंचायतीचे सरपंच श्री. रणदिवे यांनी रॉयल्टी रक्कम रुपये १,८०,६५७/- दि. ०७/०३/२०१६ रोजी फक्त मुद्दल भरणा केलेली असून व्याजाची रक्कम भरणा केलेली नाही. २. ग्रामपंचायतीचे क्लार्क श्री. पविजय खाशाबा बोडरे यांचे नावे ग्रामविकास अधिकारी श्री. अशोक मुकुंदा धाईजे व सरपंच श्री. दादा महादेव रणदिवे यांनी सन २०१५ -१६ या आर्थिक वर्षात रुपये ४,८४,५९६/- इतकी रक्कम खर्ची घातलेली आहे. ३. ग्रामपंचायतीचे दप्तर महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखा संहिता २०११ प्रमाणे ठेवण्यात आले नाही. ४. नमुना नं. ७. व नमुना नं. १० ची पावती पुस्तके पंचायत समितीकडून प्रमाणीत करून घेतलेली नाहीत, ५. महिला ग्रामसभा घेतलेल्या नाहीत. ६. वर्गीकरण रजिस्टर ठेवलेले नाही. ७. साठा नोंदवही लिहिलेली नाही. वरील सात मुद्द्यांपैकी मुद्दा क्र. १, ३, ४, ५, ६, व ७ हे प्रशासकिय मुददे असून, सदर बाबत गैरअर्जदार धाईंजे व रणदिवे यांची विभागीय चौकशी झालेली आहे. वरील पैकी मुद्दा क्र. २ मध्ये शासकिय रकमेचा गैरव्यवहार करून शासकीय रकमेचा अपहार झाला असल्याचे दिसुन येत असल्याने सदर बाबत सविस्तर चौकशी करण्यात आली. त्यामध्ये गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माळशिरस यांचेकडुन प्राप्त माहितीनुसार संबंधीत कालावधीमध्ये लोकसेवक म्हणुन अशोक धाईंजे (ग्रामसेवक), दादा रणदिवे (सरपंच), विजय बोडरे (क्लार्क) हे कार्यरत असल्याचे दिसुन येते.

सदर माहिती मधुन यातील ग्रामसेवक धाईंजे व सरपंच रणदीवे यांनी सन २०१५ मध्ये ग्रामपंचायत क्लार्क विजय बोडरे यांचे नावावर ग्रामनिधी खात्यातून ४,७३,४९६/-रु. व पाणीपुरवठा खात्यामधून ११.१००/-रु. काढल्याचे स्पष्ट होत आहे. सदर बाबत संबंधीत कॅशबुकमध्ये ग्रामसेवक धाईंजे यांनी नोंद घेतलेली दिसुन येत आहे. तसेच प्रत्येक नोंदीनंतर ग्रामसेवक धाईंजे व सरपंच रणदिवे यांनी सह्या केल्याचे दिसून येत आहे. शाखा व्यवस्थापक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, शाखा फोंडशिरस यांचेकडुन प्राप्त माहितीनुसार ग्रामपंचायत फोंडशिरसचे अकाउंटमधुन वर नमुद रकमा या ग्रामसेवक धाईंजे व सरपंच रणदीवे यांचे संयुक्त सहीने बेअरर चेकद्वारे फोंडशिरस ग्रामपंचायतचे क्लार्क विजय बोडरे यांनी काढल्याचे दिसुन येत आहे.

ॲड. धैर्यशील पाटील यांनी चार वर्ष या प्रकरणाचा पाठपुरावा सातत्याने केलेला आहे. प्रत्येक गावात ॲड. धैर्यशील पाटील यांच्यासारखे सामाजिक कार्यकर्ते व गावाच्या हिताचे सुज्ञ नागरिक तयार होतील, त्यावेळेला खऱ्या अर्थाने गावगाड्यामधील भ्रष्टाचार व शासकीय निधीचा अपहार थांबेल, असा एक प्रकारे फोंडशिरस ग्रामपंचायतमधील भ्रष्टाचाराच्या व अपहरणाच्या पाठपुराव्यावरून तालुक्यांमध्ये चर्चा सुरू आहे.

# युवा सेना शेवटच्या श्वासापर्यंत आणि रक्ताच्या शेवटच्या थेंबापर्यंत उद्धव ठाकरे साहेबांसोबत - गणेश इंगळे



**अकलूज : प्रतिनिधी**

युवा सेना जिल्हा प्रमुख गणेश इंगळे यांच्या वतीने निवडणूक आयोगाचा निषेध संगम, ता. माळशिरस येथे करण्यात आला.यावेळी युवा सेना जिल्हा प्रमुख गणेश इंगळे म्हणाले की, ही न्यायव्यवस्था काहीजणांची रखेल झाली, ही संसद देखील हिजड्यांची हवेली झाली. मी माझ्या व्यथा मांडू कोणाकडे? कारण इथली न्याय व्यवस्था भ्रष्टतेने रंगीन झाली.

केंद्रीय निवडणूक आयोगाचा निर्णय म्हणजे लोकशाही संपुष्टात येण्याची नांदी आहे. देश पुन्हा एकदा भांडवलशाहीकडे कूच करताना दिसत आहे. परंतु निष्ठावंत कट्टर शिवसैनिक आजन्म आदरणीय उध्दवजी बाळासाहेब ठाकरे यांच्या मागे असणार यात तिळमात्र शंका नाही. परंतू एखादी केंद्रीय संस्था महाराष्ट्रतील सर्व सामान्य कार्यकर्त्या चा पक्ष संपवण्यासाठी साम, दाम, दंड, भेद चा वापर करते हे लोकशाहीला घातक आहे. यास्तव असे म्हणावे लागेल पेशवाई दारावर येवुन दार ठोकत आहे. माझी सर्व उध्दवसाहेबांच्या शिवसैनिकांना विनंती आहे कि, आपण सर्वानी कोणत्याही परिस्थितीला न डगमगता ,विचलित न होता स्थिर व सावध पवित्रा घेतला पाहिजे. कारण जेव्हा योध्दा हारत नाही असे वाटते त्यावेळेस त्याला बेजार केले जाते. तेच आजकाल चालू आहे. राजकारणातील सदगृहस्थ, प्रामाणिक, आपल्या कुटुंबातील व्यक्ति श्रीमान उध्दवजी बाळासाहेब ठाकरे हयांच्या बाबत हेच होत आहे ,म्हणून आम्ही उद्धवजी ठाकरे साहेबांन सोबत आहोत हिच धगधगती मशाल घेऊन आखा महाराष्ट्र पिंजून काढू व आगामी काळात उद्धव ठाकरे साहेबांना मुख्यमंत्री बनवू .

यावेळी रमेश काकडे विकास भोई सचिन पराडे बबन पराडे अर्जुन लावंड रज्जाक मुलाणी प्रशांत पवार रामा इंगळे अक्षय पराडे नितीन इंगळे अविनाश भोई सचिन इंगळे शहाजी इंगळे ई शिवसैनिक आणि युवा सैनिक उपस्थित होते.

# देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील विकासकामांची माहिती तळागाळापर्यंत पोहचवा - आ. सुजितसिंह ठाकूर



**तुळजापूर : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाचे नेते मा.देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली जनहितार्थ सुरू असलेल्या विकासकामांची माहिती जनतेपर्यंत न्या,पक्षाकडून आलेले उपक्रम पुर्ण क्षमतेने राबवावेत त्यातुनच आपलेसुद्धा नेतृत्व समाजासमोर सिद्ध होईल असे वक्तव्य आ.सुजितसिंह ठाकुर यांनी केले ते भाजपाच्या जिल्हा कार्यकारिणी बैठकीला मार्गदर्शन करताना बोलत होते. यावेळी त्यांनी कार्यकर्ता हाच भाजपाच्या कामाचा आत्मा आहे, कार्यकर्त्याने हा पक्ष वाढवला आहे व प्रत्येकाला येथे नेतृत्व करण्याची संधी मिळते. कार्यकर्त्यांची काळजी घेणारे नेतृत्व फक्त भाजपा मध्येच असल्याचे सांगितले.

या बैठकीस मराठवाडा संघटनमंत्री संजयजी कौडगे यांची प्रमुख उपस्थिती होती व अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष नितीन काळे हे होते.

यावेळी मराठवाडा संघटनमंत्री संजय कौडगे यांनी पक्षाच्या उपक्रमात जास्तीतजास्त योगदान देण्याचे आवाहन केले. युवा वॉरीअर्स शाखा स्थापना, नवमतदार नोंदणी करण्यासाठी प्रयत्न करावे तसेच प्रत्येक गावात बुथ सशक्तीकरण अभियान राबवणे गरजेचे आहे तसेच यासह आगामी विविध कार्यक्रम राबवणे गरजेचे आहे तसेच पदाधिकाऱ्यांचे सोशलमीडिया ऑडिट केले जाणार असल्याचे सांगितले.

भारतीय जनता पक्षाची प्रदेश कार्यकारिणी बैठक नाशिक येथे पार पडली, या बैठकीचे संपुर्ण इतिवृत्त जिल्हाध्यक्ष नितीन काळे यांनी आपल्या प्रास्ताविकपर भाषणात केले.

यावेळी महाराष्ट्र सरकारने अर्थात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने घेतलेले निर्णय व त्यामुळे नागरिकांना झालेला लाभ याबाबत सविस्तर माहिती देऊन माजी जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी शिंदे-फडणवीस सरकारच्या पाठिंब्याचा राजकीय ठराव मांडला याला उपस्थित कार्यकर्त्यांनी मान्यता दिली.

तसेच किसान आघाडीचे मराठवाडा संयोजक रामदास कोळगे यांनी कृषी क्षेत्रातील आमूलाग्र बदल घडवून आणणाऱ्या निर्णयाबाबत अभिनंदनाचा ठराव मांडला,डॉ.प्रशांत पवार यांनी मा.पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या मन की बात या अभियानाची माहिती देऊन हा कार्यक्रम प्रत्येक बुथस्तरावर घेण्यासाठी कार्यकर्त्यांना आवाहन केले.

त्याचबरोबर सोशलमीडियाचा प्रभावी वापर या विषयावर पांडुरंग पवार यांनी विचार मांडले.

या बैठकीला प्रदेश कार्यक्ररिणी सदस्य ॲड.खंडेराव चौरे, सतिष दंडनाईक, ॲड. अनिल काळे, विक्रम देशमुख, नेताजी पाटील, दिपक आलुरे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष राजसिंहा राजेनिंबाळकर, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष नंदाताई पुनगडे, तालुकाध्यक्ष संतोष बोबडे, शांताराम पेंदे, यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी उपस्थित होते.

# नामवंत मल्लांनी अकलूजचे 'शिवतीर्थ' गजबजले; कुस्तीची दंगल सुरू

## अकलूज येथे त्रिमूर्ती चषक कुस्ती स्पर्धेची शानदार सुरूवात, सयाजीराजे मोहिते-पाटील यांचे हस्ते मैदान पूजन

**अकलूज : प्रतिनिधी**

हिंद केसरी आणि महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेची तुल्यबळ म्हणुन संपुर्ण देशात प्रसिध्द आहे.राज्य भरातील मल्लांसाठी पर्वनी असलेल्या अकलुज येथील त्रिमुर्ती केसरी कुस्ती स्पर्धेची शानदार सुरवात सयाजीराजे संग्रामसिंह मोहिते-पाटील यांचे हस्ते करण्यात आली.



मर्दानी व रांगडा खेळ म्हणुन प्रसिद्ध असलेल्या कुस्तीमध्ये ग्रामिण भागातील तरुणांच्या कुस्ती कौशल्याचा विकास व्हावा या ऊद्देशाने शंकरनगर येथे शिवतीर्थ आखाडा भरविण्यात येत असतो.आज पर्यंत आनेक हिंद केसरी ,महाराष्ट्र केसरी मल्लांसह आंतरराष्ट्रीय मल्लांनी शिवतीर्थ आखाडा गाजवला आहे. सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील जयंती समारंभ समिती,प्रताप क्रिडा मंडळ व महाशिवरात्र यात्रा महोत्सव समिती शंकरनगर -अकलुज यांचेवतीने भरविण्यात येत असलेल्या त्रिमुर्ती चषक कुस्ती स्पर्धेचे हे ४४ वे वर्ष आहे. सालाबाद प्रमाणे यावर्षी ही तिन दिवस त्रिमुर्ती चषक व वजनगट कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

कृषी उत्पन्न बाजार समिती अकलुजचे सभापती मदनसिंह मोहिते-पाटील, प्रताप क्रिडा मंडळाच्या अध्यक्षा स्वरुपाराणी मोहिते-पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत सयाजीराजे संग्रामसिंह मोहिते-पाटील यांचे हस्ते प्रथम मैदानाचे पुजन व सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील ,बाबासाहेब माने-पाटील व सदाशिवराव माने-पाटील यांच्या प्रतिमांचे पुजन करण्यात आले.त्यानंतर ३५ किलो गटातील मल्ल व त्रिमुर्ती चषक स्पर्धे तील मल्लांच्या कुस्ती स्पर्धेची सुरवात करण्यात आली.

दि.१७,१८ व १९ फेब्रुवारी २०२३ हे तीन होत असलेल्या या कुस्ती स्पर्धे साठी राज्यभरातुन नामवंत मल्ल सहभागी होणार आहेत.

या स्पर्धेमध्ये ८५ किलो पासुन पुढील वजनाच्या पैलवानांमध्ये त्रिमुर्ती चषकासाठी लढत होणार असुन प्रथम क्रमांकाच्या विजेत्यासाठी रुपये १ लाखांचे बक्षिस देण्यात येणार आहे. तसेच द्वितीय ५० हजार,तृतीय-२५ हजार आणि चतुर्थ बक्षिस १५ हजारांचे बक्षिस देण्यात येणार आहे. त्याच बरोबर २५ किलो पासुन ८५ किलो वजनगटातील मल्लांच्या कुस्त्या होणार असुन यातील विजेत्यांना ५०० रुपयांपासुन ६००० रुपया पर्यंतची बक्षिसांची रक्कम आहे.

या उद्घाटन प्रसंगी राष्ट्रकुल स्पर्धा विजेते राम सालनकर,महाराष्ट्र केसरी छोटा रावसाहेब मगर पै.भोजराज माने पंच वसंत जाधव ठवरे सचिव पोपटराव भोसले पाटील अभयसिंह माने देशमुख कुस्ती प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जयंतीसारखे शब्द लावताना काळीज जड होते, तुम्ही अजूनही आमच्यात आहात

- लक्ष्मण जगताप यांच्या जयंतीनिमित्त पत्नी अश्विनी जगताप यांच्या भावना

**पिंपरी : प्रतिनिधी**

तुमच्या नावापुढे आजही स्वर्गीय, जंयती असे शब्द लावताना काळीज जड होते. तुम्ही, तुमचे कार्य, तुमचा संघर्ष आणि तुमचे विचार आजही आमच्या अवतीभवती आहेत. तुम्ही पिंपरी-चिंचवडच्या विकासासाठी केलेले काम कधीही विसरता येणार नाही. तुम्ही अजूनही आमच्यात आहात, अशा शब्दांत डोळ्यात अश्रू अनावर झालेल्या अश्वनी लक्ष्मण जगताप यांनी त्यांचे पती व दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांना जयंतीनिमित्त अभिवादन केले.



पिंपरी-चिंचवडचे लोकनेते लक्ष्मण जगताप यांचे ३ जानेवारी रोजी निधन झाले. १५ फेब्रुवारी हा दिवस त्यांचा जन्मदिवस. त्यानिमित्त बुधवारी त्यांची जयंती साजरी करण्यात आली. विविध राजकीय पक्ष, संघटनांकडून पिंपळेगुरव येथील स्मृतीस्थळावर जाऊन दिवंगत लक्ष्मण जगताप यांना अभिवादन केले. संपूर्ण जगताप कुटुंबानेही स्मृतीस्थळावर जात त्यांना अभिवादन केले. सध्या चिंचवड विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणूक सुरू आहे. भाजपने दिवंगत लक्ष्मण जगताप यांच्या पत्नी अश्विनी लक्ष्मण जगताप यांना उमेदवारी दिली आहे. पतीच्या निधनाला ५० दिवसही पूर्ण झालेले नसताना अश्विनी जगताप दुःख बाजूला सारून निवडणूक लढवत आहेत.

पतीला अग्नी दिल्यानंतर आता निवडणूक प्रचारातच त्यांची जयंती साजरी करण्याची वेळ अश्विनी लक्ष्मण जगताप यांच्यावर आली आहे. त्या संपूर्ण जगताप कुटुंबासोबत बुधवारी सकाळी पतीच्या स्मृतीस्थळावर गेल्या. तेथे डोके टेकवून त्यांनी आपल्या अश्रूला वाट मोकळी करून दिली. डोळ्यात अश्रूंसोबत हात जोडून त्यांनी पती लक्ष्मण जगताप यांना अभिवादन केले.

तुमच्या नावापुढे आजही स्वर्गीय, जयंती असे शब्द लावताना काळीज जड होते. तुम्ही, तुमचे कार्य, तुमचा संघर्ष आणि तुमचे विचार आजही आमच्या अवतीभवती आहेत. तुम्ही पिंपरी-चिंचवडच्या विकासासाठी काम केले. प्रसंगी कुटुंबाकडे दुर्लक्ष केले. तुम्ही केलेले काम कधीही विसरता येणार नाही. तुम्ही अजूनही आमच्यात आहात. त्याच प्रेरणेतून मी दीनदुबळ्यांची, वंचितांची, गरजूंची सेवा करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणार आहे, अशा शब्दांत अश्वनी लक्ष्मण जगताप यांनी आपल्या दिवंगत पतीला अभिवादन केले.

# मनाचे आरोग्य सुधारण्याचे ब्रम्हाकुमारीज यांचे कार्य कौतुकास्पद -डॉ. एम. के. इनामदार



**अकलूज : प्रतिनिधी**

आजच्या धकाधकीच्या जीवनात शारीरिक आजारांबरोबरच मानसिक आरोग्यांनी ग्रस्त असलेल्या रुग्णांची संख्या वाढत चालली आहे.अशा परिस्थितीत ब्रम्हाकुमारीज संस्थेच्या वतीने माणसाचे मनोबल व आत्मविश्वास तथा मानसिक आरोग्य वाढविण्याचे होत असलेले कार्य कौतुकास्पद असल्याचे गौरवोद्गार प्रसिद्ध हृदयरोगतज्ञ डॉ.एम.के. इनामदार यांनी केले.

अकलूज येथील ब्रम्हाकुमारीज ईश्वरीय विश्वविद्यालय शाखेच्या वतीने आयोजित ''महाशिवरात्री पावन पर्व''च्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.यावेळी पोलीस अधिकारी गणेश चौधरी,सुनिल फडे,विजय शिंदे,बी.के.डॉ. पावले भाई, संस्थेच्या संचालिका बी.के. शिवरात्री,बी.के.गोदावरी,बी.के.अनु,बी.के.प्रिती बहेनजी व ब्रम्हाकुमारीज परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते शिवध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले.यावेळी ''विशेषता द्वारा विश्व कल्याणकारी बनने का संकल्प'' या विषयावर बी.के शिवरात्री बहेनजींनी मार्गदर्शन केले.तर बी.के.अनु बहेनजींनी महाशिवरात्रीचे अध्यात्मिक रहस्य स्पष्ट केले.

सूत्रसंचालन व आभार बी.के. गोदावरी बहेनजी यांनी मानले.

# आयुष्यमान भारत योजनेसाठी अकलूज परिसरातील १०० टक्के नागरिकांनी नोंदणी करावी- शिवतेजसिंह मोहिते पाटील

**अकलूज : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या महत्वकांक्षी आयुष्यमान भारत योजनेसाठी अकलूज परिसरातील १०० टक्के नागरिकांची नाव नोंदणी करून घेण्याचे आवाहन अकलूज ग्रामपंचायतीचे माजी सरपंच शिवतेजसिंह मोहिते पाटील यांनी केले आहे.



अकलूज- माळेवाडी नगरपरिषद अंतर्गत येणाऱ्या ३१ बूथ मधील प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक आज शिवकीर्ती बंगला येथे शिवतेजसिंह मोहिते पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीत आयुष्यमान भारत योजनेसंदर्भात बूथ प्रमुखांना मार्गदर्शन करण्यात येऊन १०० टक्के नागरिकांची नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले.

यावेळी बोलताना शिवतेजसिंह म्हणाले, आयुष्यमान भारत ही योजना गोरगरीब नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण आहे. यामध्ये केंद्र सरकार कडून आलेल्या यादीनुसार नोंदणी केल्यानंतर प्रत्येक कुटुंबाला ५ लाख रुपयांपर्यंत मोफत उपचाराचा विमा मिळणार आहे. सध्या अकलूज मध्ये अकलूज क्रिटिकेअर व कदम मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल येथे या योजनेद्वारे मोफत उपचार करण्यात येत असून लवकरच आ. रणजितसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हॉस्पिटल ची संख्या वाढविण्यात येणार असल्याचेही शिवतेजसिंह मोहिते पाटील यांनी सांगितले. तसेच नाव नोंदणी साठी अकलूज- माळेवाडी परिसरात दहा ठिकाणी कॅम्प लावण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

या बैठकीत भाजपा माळशिरस तालुका सरचिटणीस सुरज मस्के, शक्ती केंद्रप्रमुख स्वप्निल शहाणे, गणेश भिंगे, रोहित शेटे यांच्यासह ३१ बूथ वरील शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

# धनगर सोशल ऑर्गनायझेशनच्या राष्ट्रीय सल्लागार समिती सदस्यपदी अकलूजचे पत्रकार भाग्यवंत नायकुडे

**अकलूज : प्रतिनिधी**



धनगर सोशल ऑर्गनायझेशन (धनगर जोडो अभियान )च्या राष्ट्रीय सल्लागार समितीच्या सदस्यपदी अकलूज पत्रकार भाग्यवंत नायकुडे यांची निवड केल्याचे पत्र धनगर सोशल ऑर्गनायझेशनचे संस्थापक अध्यक्ष बबनराव आटोळे व सचिव अजय गाढवे यांनी दिले आहे.

या निवडीबद्दल भाग्यवंत नायकुडे म्हणाले की, संघटना बळकटीसाठी व मजबूत करण्यासाठी तसेच संघटनेची ध्येय धोरणे समाजातील सर्वसामान्यां पर्यंत पोहोचविण्यासाठी मी सदैव तत्पर राहुन समाजासाठी कार्य करीन अशी ग्वाही त्यांनी दिली. या निवडीबाबत धनगर सोशल ऑर्गनायझेशन चे संस्थापक अध्यक्ष बबनराव आटोळे, उपाध्यक्ष विशाल पोले, कार्याध्यक्ष व्यंकटेश चामनर, सचिव अजय गाढवे ,खजिनदार रघुनाथ कुवर ,आदि पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

मुख्य *संपादक : राही भिडे, हे दैनिक राजदंड मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा. लि., सर्व्हे नं. १२९, हिस्सा नं. ११ / २ आणि १ / १३, वारजे पुणे - ४११ ०५८ येथे मुद्रित करून न्याती ग्रँडीयर, १०२ ग्रीनविच, कडनगर, उंड्री, पुणे -४११ ०६० येथून प्रकाशित केले. दैनिक राजदंडमधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. (*पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी) दूरध्वनी : पुणे (०२०)२६९०९०३१, इमेल-rajdand.pune@gmail.com
या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या लेख, बातम्या, जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील. Declaration No. : SDM/SR/07/2023

# शिव विचारांचे बोट धरूनच मी पुढे जात आहे

## खासदार उदयनराजे भोसले यांचे भावनिक उद्गार

**सातारा : प्रतिनिधी**

छत्रपती शिवरायांचा वैचारिक वारसा साडेतीन शतकानंतर आजही अनुकरणीय आहे हा वारसा नव्या पिढीने नक्कीच स्वीकारायला हवा शिव विचारांचे बोट धरूनच माझी पुढील वाटचाल सुरू आहे असे भावनिक प्रतिपादन खासदार उदयनराजे भोसले यांनी केले.



छत्रपती शिवाजी संग्रहालयाच्या मुख्य दालनामध्ये शिवपुतळा आणि छत्रपती शिवरायांचे तख्त शिवजयंती निमित्त सातारकरांसाठी खुले करण्यात आले आहे. या तख्ताचे दर्शन खासदार उदयनराजे भोसले यांनी रात्री अकरा वाजता घेतले. शिवरायांचे तख्त पाहून उदयनराजे भोसले भावनिक झाले त्यांनी या अमूल्य ठेव्याला खाली झुकून वंदन केले तसेच छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी माजी उपनगराध्यक्ष सुहास राजे शिर्के शिवाजी संग्रहालयाचे सहाय्यक अभिरेक्षक प्रवीण शिंदे विनीत पाटील इत्यादी यावेळी उपस्थित होते.

खासदार उदयनराजे भोसले बोलताना म्हणाले छत्रपती शिवराय हे व्यक्तिमत्व सर्व युगामध्ये आदरणीय आहेत त्यांनी सार्वभौमत्वाचे आणि समानतेचे दिलेले विचार आजही मार्गदर्शक आहेत त्यांच्या शिवविचाराचे बोट धरूनच माझी पुढील वाटचाल सुरू असल्याचे उदयनराजे भोसले यांनी सांगितले . छत्रपती शिवाजी संग्रहालयाच्या नूतनीकरणासह शिवराय तख्त खुले करण्याच्या अभिनव संकल्पनेचे तसेच त्यासाठी पाठपुरावा करणारे माजी उपनगराध्यक्ष सुहास राजे शिर्के व संग्रहालयाचे सहाय्यक अभिरेक्षक प्रवीण शिंदे यांचे उदयनराजे यांनी आवर्जून कौतुक केले. छत्रपती शिवाजी संग्रहालय लवकरच योग्य सुविधांसह सातारकरांसाठी खुले होईल अशी स्पष्ट ग्वाही सुद्धा त्यांनी दिली.

### शिवजयंतीनिमित्त किल्ले प्रतापगड येथे जिल्हा प्रशासन व जिल्हा परिषदेच्या वतीने कार्यक्रमांचे आयोजन

**महाबळेश्वर : प्रतिनिधी**

जिल्हा प्रशासन व जिल्हा परिषदेच्या वतीने दि. १९ फेब्रुवारी २०२३ रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त किल्ले प्रतापगड येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या निमित्ताने पुढीलप्रमाणे कार्यक्रम होणार आहेत. सकाळी ७ वा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते भवानी मातेचा अभिषेक, ८ वा महापूजा, ९ वा. ध्वजबुरुज येथे मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण, ९.३० वा. भवानी माता मंदीरसमोर ध्वजारोहण. ९.३५ वा. पालखी मिरवणूक, १० वा. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे पूजन व जय जय महाराष्ट्र माझा या गीतास राज्य गीत म्हणून अंगिकरण्याचा कार्यक्रम.

राज्य गीत गायन, पोवाडा गायन व सांस्कृतिक कार्यक्रम, या प्रमाणे कार्यक्रम संपन्न होणार आहे.

# शिवतीर्थाच्या विकास आराखड्याचा आमदार शिवेंद्रसिंहराजे यांनी घेतला आढावा

■ मुख्याधिकारी अभिजीत बापट थेट पोहोचले 'सुरूची'वर



**सातारा : प्रतिनिधी**

पोवई नाक्यावरील शिवपुतळा विकसन आराखड्याची माहिती आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी घेतली. सातारा पालिका मुख्याधिकारी अभिजीत बापट यांच्याशी शिवेंद्रसिंहराजे यांनी चर्चा करून त्यांना योग्य त्या सूचना दिल्या.

पोवई नाका येथील ऐतिहासिक शिवतीर्थ सुशोभीकरणासाठी राज्य शासनाकडून सातारा नगर पालिकेला ८ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला आहे. आज शिवतीर्थ सुशोभीकरणाच्या आराखड्याची शिवेंद्रसिंहराजे यांनी पाहणी केली. यावेळी पालिकेचे मुख्याधिकारी अभिजित बापट यांच्याकडून सुशोभीकरण कशापद्धतीने होणार आहे याची सविस्तर माहिती जाणून घेतली. सुशोभीकरणाचे काम तातडीने सुरु करून काम दर्जेदार करा आणि काम लवकरात लवकर पूर्ण करा. तसेच काम करताना शिवतिर्थाचे पावित्र्य अबाधित राखले जाईल, याची दक्षता घेण्याच्या सूचना श्री. बापट यांना केल्या.

बऱ्याच दिवसापासून शिवतीर्थ परिसराचे काम रेंगाळतच चालले होते. हे काम दर्जेदार व्हावे यासाठी शिवप्रेमी आग्रही आहेत. आठ कोटी रूपयांच्या विकास आराखड्यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचा दिमाख कायम ठेऊन त्याच्या सौंदर्याला अडथळा न आणता विकास कामे केली जावीत असा आग्रह आमदार शिवेंद्रसिंहराजे यांनी धरला आहे.

### ध्वनीक्षेपक/ध्वनीवर्धक वापरण्यास सूट देण्याबाबतचे आदेश निर्गमित

**सातारा : प्रतिनिधी**

सण व उत्सवांच्या दिवसांसाठी शासन निर्णयात दिलेल्या निर्देशानुसार जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी रुचेश जयवंशी यांनी प्राप्त अधिकारानुसार खालीलप्रमाणे ध्वनीची विहित मर्यादा राखून ध्वनीक्षेपक/ध्वनीवर्धक सकाळी ६ वाजल्या पासून ते रात्री १२ वाजेपर्यंत सूट देण्याबाबतचे आदेश निर्गमित केले आहेत.

या आदेशानुसार दि. १९ फेब्रुवारी २०२३ शिवजयंती, १४ एप्रिल डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, १ मे महाराष्ट्रदिन/कामगार दिन, २० सप्टेंबर गणेशोत्सवाचा दुसरा दिवस, २३ सप्टेंबर गणेशोत्सवाचा पाचवा दिवस(गौरी विसर्जन), २७ सप्टेंबर गणेशोत्सवाचा नववा दिवस, २८सप्टेंबर गणेशोत्सव (अनंत चतुर्दशी) व ईद-ए-मिलाद, २३ ऑक्टोबर नवरात्र अष्टमी (खंडेनवमी), २४ ऑक्टोबर विजयादशमी (दसरा), १२ नोव्हेंबर दिपावली (लक्ष्मीपुजन), २५ डिसेंबर ख्रिसमस (नाताळ), ३१ डिसेंबर २०२३ या दिवसांसाठी सुट देण्यात आली आहे.

तसेच जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेने महत्वाच्या कार्यक्रमासाठी आवश्यकतेनुसार सुट दिली जाईल.

# शिवसेनेच्या मालकीमुळे मुख्यमंत्री शिंदे यांच्या सातारा जिल्ह्यात जल्लोष

**सातारा : प्रतिनिधी**

निवडणूक निर्णय आयोगाने शिवसेना हे नाव आणि धनुष्यबाण हे चिन्ह एकनाथ शिंदे यांच्या बाळासाहेबांची शिवसेना या गटाला प्रदान केल्यामुळे शिंदे समर्थकांनी सातारा जिल्ह्यात आणि शहरात एकच जल्लोष केला शिवसेनेची मूळ मालकी असणाऱ्या ठाकरे गटाला हा मोठा धक्का मानला जात आहे.

राज्यातील सत्ता परिवर्तनानंतर शिवसेनेमध्ये दोन गट पडले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटाला बाळासाहेबांची शिवसेना तर ठाकरे गटाला उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना असे नामकरण करण्यात आले होते मात्र शिवसेना मूळ कोणाची या संदर्भातील सुनावणी आज अखेर प्रलंबित होती मात्र शुक्रवारी निवडणूक निर्णय आयोगाने शिवसेना आणि धनुष्यबाण हे चिन्ह शिंदे गटाला बहाल केल्यामुळे सातारा जिल्ह्यामध्ये एकच जल्लोष झाला.




सातारा शहरातील मुख्यमंत्री समर्थक निलेश मोरे यांच्या संपर्क कार्यालयांमध्ये शिंदे गटाच्या शहर कार्यकारिणीने एकत्र येऊन आनंदोत्सव साजरा केला एकमेकांना पेढे भरून तोंड गोड केले. यासंदर्भात पालकमंत्री शंभूराजे आणि आमदार महेश शिंदे यांनी एकमेकांना फोनवरून शुभेच्छा दिल्या आगामी सातारा जिल्ह्याच्या राजकारणासह राज्यामध्ये शिंदे गटाचे पारडे या निर्णयामुळे वरचढ राहणार असल्याचे मानले जात आहे. पुढील काळात होणाऱ्या जिल्हा परिषद सातारा नगरपालिका निवडणुकांमध्ये शिंदे गटाची म्हणजेच शिवसेनेची मुसंडी एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली होणार असल्याचे आता स्पष्ट झाले आहे. सातारा जिल्ह्यातील ठाकरे गटाचे शिवसैनिक आता कोणती भूमिका घेत आहेत हे पाहणे आता अचूक याचा विषय ठरणार आहे.

केंद्रीय निवडणूक आयोगाने दिलेल्या निकालामुळे शिंदे गट शिवसेनेसाठी आजचा हा आनंदाचा दिवस आहे. या निकालाच्या रुपाने आम्हाला शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे बाळासाहेब ठाकरे यांचा आशीर्वाद मिळाला आहे. यापुढे आम्ही शिवसेनेचे ज्वलंत हिंदूत्वाचे काम अधिक जोमाने देशभर करणार आहोत. अखेर सत्याचा व न्यायाचा विजय झाला, अशी प्रतिक्रिया राज्याचे उत्पादन शुल्क मंत्री व सातारचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी दिली.

# सातारा शहराचा पाणीपुरवठा दोन दिवस बंद

**सातारा : प्रतिनिधी**

कास पाणीपुरवठा योजनेच्या बंदिस्त जलवाहिनीला कासाणी, आटाळी गावाजवळ मुख्य लाईनला दोन ठिकाणी गळती लागली आहे. पालिकेकडून ही गळती काढण्याचे काम मंगळवार, दि. २१ व बुधवार, दि. २२ रोजी युध्दपातळीवर हाती घेतले आहे. त्यामुळे मंगळवारी सायंकाळी व बुधवारी सकाळच्या सत्रातील पाणीपुरवठा कमी दाबाने अथवा पूर्णपणे बंद राहील, अशी माहिती मुख्याधिकारी अभिजीत बापट यांनी दिली.

सातारा शहराला कास व शहापूर योजनेद्वारे पाणीपुरवठा केला जातो. कास योजनेच्या मुख्य जलवाहिनीला कासाणी, व आटाळी गावाजवळ दोन ठिकाणी मोठ्या प्रमाणात गळती लागली आहे. पाणीपुरवठा विभागाकडून गळती काढण्याचे काम मंगळवारी हाती घेतले जाणार आहे. या कामासाठी साधारणपणे आठ तासांचा कालावधी लागू शकतो, त्यामुळे कास योजनेतून मंगळवारी सायंकाळी व बुधवारी सकाळच्या सत्रात होणारा पाणीपुरवठा कमी दाबाने होईल अथवा होणारच नाही.

मंगळवार, दि. २१ रोजी सायंकाळ सत्रातील कास माध्यमातील पोळ वस्ती, संत कबीर सोसायटी तसेच डोंगराळ भागातील बालाजी नगर, कांबळेवस्ती, जांभळेवाडा या परिसरातील तसेच कात्रेवाडा टाकी माध्यमातील सायंकाळी सत्रातील होणारा पाणीपुरवठा होवूच शकणार नाही. तसेच बुधवार, दि. २२ रोजी कास माध्यमातील सकाळ सत्रातील पॉवर हाऊस येथून होणारा पेठ यादोगोपाळपेठ, मंगळवार पेठ, या पेठांना तसेच कात्रेवाडा टाकी, गुरुकुल टाकी, व्यंटकपुरा टाकी, भैरोबा टाकी, कोटेश्वर टाकी या टाक्यांच्या माध्यमातुन वितरण होणाऱ्या भागातील पाणीपुरवठा अपुऱ्या प्रमाणात अथवा न होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी पाण्याचा वापर काटकसरीने करुन प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन मुख्याधिकारी तथा प्रशासन अभिजीत बापट यांनी केले.

# प्रतापसिंहनगर येथे दोन गटात राडा

**सातारा : प्रतिनिधी**

सातारा शहराजवळील प्रतापसिंहनगरात दोन गटात किरकोळ कारणावरून राडा झाला. यामध्ये लाकडी दांडके, लोखंडी रॉड, धारदार शस्त्रांचा वापर करण्यात आला. याप्रकरणी सातारा शहर पोलिस ठाण्यात परस्परविरोधी तक्रारी दाखल असून, पोलिसांनी १४ जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, दि. १५ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास हा प्रकार घडला. याप्रकरणी शेखर संतोष बोकेफोडे (रा. प्रतापसिंहनगर) यांनी तक्रार दिली आहे. या तक्रारीनुसार सचिन विठ्ठल भालेराव, नितीन विठ्ठल भालेराव, लक्ष्मण विठ्ठल भालेराव, संजय विठ्ठल भालेराव, मयूर अरुण तुपारे, चैतन्य अरुण तुपारे, सविता अरुण तुपारे, प्रतीक्षा अरुण तुपारे, ओंकार भालेराव आणि बंडू भालेराव यांच्यासह अन्य दोघांवर गुन्हा दाखल झाला आहे. काहीतरी कारणावरून चिडून धारदार शस्त्र, लोखंडी रॉड, लाथाबुक्क्यांनी मारहाण केली, असे या तक्रारीत म्हटले आहे.

दुसऱ्या बाजूने सविता अरुण तुपारे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, नेताजी तानाजी बोकेफोडे, माऊली तानाजी बोकेफोडे, विनोद संतोष बोकेफोडे, प्रमोद संतोष बोकेफोडे (सर्व रा. प्रतापसिंहनगर) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. डोक्यात बाटली फोडून जखमी करणे तसेच लाकडी दांडक्याने मारहाण केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. याप्रकरणी सातारा शहर पोलिस अधिक माहिती घेत आहेत.

### लोणंद येथे शिवजयंतीनिमित्त सोमनाथ गोडसे यांचे व्याख्यान

**लोणंद : प्रतिनिधी**

लोणंद येथे रविवार दिनांक १९ फेब्रुवारी २०२३ रोजी महाराष्ट्राचे आराध्य दैवत ,स्वराज्याचे शिल्पकार छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याबद्दल लोकांना माहिती व्हावी यासाठी इतिहास अभ्यासक सोमनाथ गोडसे यांच्या व्याख्यानाचे आयोजन मराठा समाज मंडळ यांच्या वतीने करण्यात आले आहे.

मराठा समाज मंडळाच्या वतीने भव्य सार्वजनिक शिवजयंती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून रविवारी सकाळी आठ वाजता लोणंद शहरातून छत्रपती शिवाजी. महाराजांच्या मुर्तीची शाही मिरवणूक काढण्यात येणार आहे. तसेच सायंकाळी सहा वाजता लोणंद नगरपंचायतीच्या पटांगणावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. ढाल तलवारी पलीकडील शिवराय या विषयावर इतिहास अभ्यासक सोमनाथ गोडसे यांची व्याख्यान होणार आहे तरी सर्वांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन मराठा समाज मंडळाच्या वतीने करण्यात येत आहे.

# फलटण तालुक्यातील मराठा क्रांती मोर्चाच्या १५ गाव शाखांचे १९ फेब्रुवारीला उद्घाटन

### युवती व महिलांच्या हस्ते होणार उद्घाटन

**फलटण : प्रतिनिधी**

'मराठा क्रांती मोर्चा गाव तिथे शाखा व राजकारणविरहित एकजूट' या संकल्पनेतून मराठा क्रांती मोर्चा फलटणच्या शाखा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त स्थापन करण्यात येणार असून त्याचा पहिला टप्पा रविवार, दि.१९ फेब्रुवारीला सुरू होत असून तब्बल पंधरा गावात या शाखेचे उद्घाटन होणार आहे. यावेळी सर्व समन्वयक व मार्गदर्शक व समाजबांधवांनी उपस्थित राहावे, असे आवाहन मराठा क्रांती मोर्चातर्फे करण्यात आले आहे.

मराठा क्रांती मोर्चा संपूर्ण महाराष्ट्रात जिल्ह्या-जिल्ह्यात निघत असताना तालुका पातळीवर सर्वात मोठा मोर्चा फलटण तालुक्यात निघाला. त्यामध्ये फलटणमध्ये लाखोंच्या संख्येने समाजबांधव उपस्थित




राहून एकजूट दाखविली होती. त्याची दखल घेत 'मराठा खडा तो सबसे बडा' हे दाखविले.

दरम्यान, त्यानंतर कोरोनामुळे काहीशी मरगळ समाजामध्ये आली होती. ती मरगळ झटकुन पुन्हा एकदा हाक देत ''एक मराठा लाख मराठा'' देऊन सर्वांनी एकत्र येऊया, अशी हाक व साथ दिली. त्याअनुषंगाने 'गाव तिथे राजकारण विरहित ''मराठा क्रांती मोर्चा''शाखा स्थापन करण्याची संकल्पना पुढे आली. त्यामुळे सर्वांनी एकत्र येऊन सामाजिक बांधिलकी जोपासू व आपल्या मराठा बांधवाला साथ देऊ असे ठरले. त्यासाठी मुख्य समन्वयकांनी गावागावात जाऊन राजकारणविरहित मराठा म्हणून एकत्र येण्याचे आवाहन केले व सर्वांनी त्या आवाहनाला मोठा प्रतिसाद दिला आहे.

दरम्यान, आता पहिल्या पंधरा शाखांचे उद्घाटन छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती दिवशी रविवार, दि.१९ फेब्रुवारीला होत असून त्याचे उद्घाटन त्या त्या गावातील युवती व महिलांच्या हस्ते केले जाणार आहे. त्यासाठी मुख्य समन्वयक सकाळी ७ वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांना फलटण येथे अभिवादन करतील व त्यानंतर झडकबाईचीवाडी, ताथवडा, पिराचीवाडी, मिरेवाडी, वाघोशी, वडगावं,कोऱ्हाळे, वडजल, काशिदवाडी, ढवळेवाडी, निंभोरे, संगमनगर(नांदल), मुळीकवाडी, बिबी, घाडगेवाडी या पंधरा गावात शाखा होणार असून सर्व समन्वयक, मार्गदर्शक व समाजबांधवांनी उपस्थित राहावे, असे आवाहन मराठा क्रांती मोर्चा फलटणने केले आहे.

### औद्योगिक वसाहतीतून ६८ हजारांचे लोखंडी बार चोरीला

**सातारा : प्रतिनिधी**

सातारा शहराजवळील औद्योगिक वसाहतीतील एका कंपनीतून ६८ हजार रुपयांचे लोखंडी बार चोरून नेण्यात आले. याप्रकरणी सातारा शहर पोलिस ठाण्यात अज्ञाताविरोधात गुन्हा नोंद झाला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, याप्रकरणी जयराम धनाजी देवकर (अमरलक्ष्मी, सातारा) यांनी तक्रार दिली आहे. या तक्रारीनुसार दि. १५ फेब्रवारी रोजी दुपारी दोन ते साडेतीन या वेळेत ही चोरी करण्यात आली आहे. यामध्ये ६१ एमएम जाडीचे आणि ६५ एमएम जाडीचे कट केलेले लोखंडी बार चोरून नेण्यात आले. याची किंमत ६८ हजार ५०० रुपये आहे. याप्रकरणी सातारा शहर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद झाला आहे. हवालदार भिसे तपास करीत आहेत.

# स्वित्झर्लंडच्या धर्तीवर वेण्णालेक बायपास पुलाचे बांधकाम केले जावे

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे मुख्य अभियंता राजेंद्र रहाणे

**महाबळेश्वर : प्रतिनिधी**

देशविदेशातील पर्यटकांच्या पसंतीचे ठिकाण असलेल्या महाबळेश्वर पर्यटनस्थळाच्या सौंदर्यात भर पडेल अश्या पद्धतीने वेण्णालेक बायपास पुलाचे बांधकाम करता येईल पुलाच्या दोन्ही बाजूला मोठे फुटपाथ तयार कारण त्या पुलावर उभे राहून निसर्ग सौंदर्याचा व पर्यटनाचा आनंद लुटता येईल अश्या पद्धतीने स्वित्झर्लंडच्या धर्तीवर या पुलाचे बांधकाम केले जावे, अशा सूचना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे मुख्य अभियंता राजेंद्र रहाणे यांनी केले यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता संजय सोनावणे उपस्थित होते



आज सायंकाळी महाबळेश्वरच्या वाहतूक कोंडीत महत्वाची भूमिका बजावणारे वेण्णालेक बायपास प्रकल्पाच्या जागेची पाहणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,सार्वजनिक बांधकाम विभाग,जलसंपादा आदी विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यानी केली या पाहणी वेळी रहाणे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना सूचना केली यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता संजय सोनावणे,कार्य.अभियंता पल्लवी चौगुले मोटे,जलसंपदा विभागाचे उपअभियंता एस पि जोशी,उपअभियंता ए एस तराळ सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप विभागीय अभियंता अजय देशपांडे शाखा अभियंता शिवप्रसाद धुमाळ आदी उपस्थित होते.

महाबळेश्वरचे सुपुत्र महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री पदाची सूत्रे हाती घेतल्यावर संपूर्ण महाबळेश्वर तालुक्याचा सर्वांगिण विकास करण्याचे धोरण स्विकारले आहे या साठी प्रत्येक प्रकल्पासाठी ते भरघोस निधी उपलब्ध करून देत आहेत त्याच प्रमाणे गेली अनेक वर्षे शासनाच्या लालफितीत अडकलेल्या प्रकल्पांना देखिल चालना देण्यास सुरूवात केली आहे येथील नागरीकांनी अशाच रखडलेल्या वेण्णालेक बायपास प्रकल्पा बाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या बरोबर चर्चा केली मुख्यमंत्री शिंदे हे महाबळेश्वरला आले तेव्हा या प्रकल्पाची माहीती घेवुन त्यांनी संबंधित विभागाला प्रकल्प मार्गी लावण्याच्या सुचना केल्या होत्या परंतु या सूचना करून देखील गेली आठ महिने या बायपास पूला संदर्भात कोणत्याच हालचाली होत नव्हत्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व वनविभाग या प्रकल्पासाठी परवानगी मिळत नव्हती त्यामुळे हा महत्वपूर्ण प्रकाला किती दिवस रखडणार असा सवाल महाबळेश्वरकरांनी उपस्थित केला होता महाबळेश्वरकरांच्या मागणीची दाखल घेऊन खा डॉ श्रीकांत शिंदे पालकमंत्री ना शंभूराज देसाई आ मकरंद पाटील हे देखील या बायपास पुलाच्या कामाचा पाठपुरावा करत होते या प्रकल्पातील अडचणी समजावून घेत त्या त्या विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत ते चर्चा करत होतेया सर्वांचा वाढत दबाव लक्षात घेता आज प्रत्यक्ष विविध विभागाच्या अधिकाऱ्यांनी बायपास प्रकल्पाच्या जागेची पाहणी करून या बायपास प्रकल्प पूर्ण करण्याच्या दृष्टीने या सर्व अधिकाऱ्यांनी सकारात्मक चर्चाकरून प्रकल्प पूर्ण होण्याच्या दृष्टीने एक पाऊल पुढे उचलले.

या बायपास प्रकल्पात समाविष्ट असलेल्या पूल व रस्त्यासाठी १५ कोटीरुपयांचा निधी शासनाने उपलब्ध करून दिला आहे आजच्या पाहणीवेळी अधिकाऱ्यांनी उचललेले सकारात्मक पाऊल पाहता उन्हाळी हंगामापूर्वी हा पूल तयार होईल व या पुलावरून देशविदेशातील पर्यटक वर्षा सहलीचा आनंद लुटताना दिसतील असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

# सावकारकीपोटी लहान मुलीला ओलीस ठेवणाऱ्या तीन जणांची टोळी सातारा जिल्ह्यातून हद्दपार

## पोलीस अधीक्षक समीर शेख यांची कारवाई

**सातारा : प्रतिनिधी**

सातारा शहर परिसरामध्ये सावकारी करणारे सराईत गुन्हे करत लहान मुलीला ओलीस ठेवणाऱ्या तीन जणांची टोळी पोलीस अधीक्षक समीर शेख यांनी दोन वर्षाकरिता सातारा जिल्ह्यातून तडीपार केले आहे.





संजय बबन कदम वय ५१ वर्ष टोळीप्रमुख, अश्विनी संजय बाबर वय २८ राहणार आमनेवाडा सदर बाजार, संकेत दिनेश राजे वय ३१ राहणार भीमाबाई आंबेडकर नगर सदरबाजार अशी तिघांची नावे असून तडीपारी बाबतचा त्यांचा प्रस्ताव सातारा शहर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक भवन निंबाळकर यांनी महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५५ नुसार हद्दपार प्राधिकरण तथा पोलिस अधीक्षक समीर शेख यांना सादर केला होता.

सदर प्रस्तावामध्ये या टोळीविरुद्ध दाखल असलेल्या सावकारी गुन्ह्यांमध्ये त्यांना अटक करण्यात आली होती. मात्र जामिनावर बाहेर आल्यानंतर त्यांच्यावर वेळोवेळी प्रतिबंधात्मक कारवाईचा कोणताही परिणाम झाला नाही उलट सावकारकीच्या कामापोटी त्यांनी लहान मुलीस पोलीस ठेवले होते. सर्वसामान्य जनतेस त्यांचा उपद्रव होऊ लागल्याने त्यांच्यावर जनतेतून कारवाईची मागणी करण्यात आली होती. पोलीस अधीक्षक समीर शेख यांनी सदर टोळीवरील गुन्ह्यांची माहिती घेऊन त्यांना महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५५ नुसार दोन वर्षाकरिता सातारा जिल्ह्यातून हद्दपारचा आदेश पारित केला. समीर शेख यांनी नोव्हेंबर २२ पासून तीन उपद्रवी टोळ्यांमधील नऊ आत्तापर्यंत हद्दपार केले आहे. भविष्यातही सातारा जिल्ह्यातील सर्वात गुन्हेगारांच्यावर हद्दपारची तसेच मोका अंतर्गत कारवाई करण्यात येणार आहे.

हद्दपार प्राधिकरण पुढे सरकार पक्षाच्या वतीने अपर पोलीस अधीक्षक बापू बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली सानेगुनी शाखेचे पोलीस निरीक्षक अरुण देवकर पोलीस उपनिरीक्षक मधुकर गुरव, हवालदार प्रमोद सावंत, केतन शिंदे, अनुराधा सणस यांनी योग्य तो पुरावा सादर केला आहे.

# आपण दिवाळखोर झालो आहोत, आता आयएमएफही आपल्याला वाचवू शकत नाही

## पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांची कबुली

**इस्लामाबाद : वृत्तसंस्था**

पाकिस्तान एकीकडे दिवाळखोरी टाळण्यासाठी आयएमएफकडे कर्ज मागत आहे. दुसरीकडे, शनिवारी पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा मोहम्मद आसिफ यांनी एका कार्यक्रमादरम्यान सांगितले की, पाकिस्तान आधीच दिवाळखोर झाला आहे. आपण सर्वजण दिवाळखोर देशात राहत आहोत.

पाकिस्तानच्या आर्थिक संकटाबाबत ख्वाजा आसिफ म्हणाले की, आता आयएमएफही आपल्याला मदत करू शकत नाही. यावर आपल्यालाच उपाय शोधावा लागेल.

**नोकरशाही आणि राजकारण्यांना जबाबदार धरले**

पाकिस्तानच्या संरक्षणमंत्र्यांनी देशाच्या आर्थिक स्थितीसाठी तेथील नेते आणि नोकरशाहीला जबाबदार धरले आहे. ते म्हणाले की, पाकिस्तानच्या संविधानाचे पालन केले गेले नाही. त्याचवेळी ख्वाजा आसिफ यांनी इम्रान सरकार देशात दहशतवाद्यांना आश्रय देत असल्याचा आरोप केला. ते म्हणाले की, सुमारे दीड वर्षांपूर्वी देशात दहशतवाद्यांचे पुनर्वसन करण्यात आले, तर सरकारवर टीका करणाऱ्यांना देश सोडून जाण्यास भाग पाडले जात होते.

**पाकिस्तानमध्ये आर्थिक संकटामुळे वाईट परिस्थिती**



आर्थिक संकटामुळे पाकिस्तानची स्थिती किती बिकट आहे, याचा अंदाज तेथील पंतप्रधान शाहबाज शरीफ यांच्या वक्तव्यावरून लावता येतो. देशातील परिस्थितीवर भाष्य करताना ते म्हणाले होते की, पाकिस्तान हा अणुशक्ती असलेला इस्लामिक देश आहे आणि जर आपल्याला प्रत्येक वेळी आणि कुठेही भीक मागावी लागत असेल तर यापेक्षा लाजिरवाणी दुसरी गोष्ट असू शकत नाही.

आर्थिक अडचणींमुळे पाकिस्तानातील अनेक भागात पिठाचा तुटवडा निर्माण झाला आहे. अनुदानित पिठाचा साठा संपला आहे. यामुळेच सरकार देशातील विविध भागांमध्ये जनतेला कमी किमतीत पिठाची पाकिटे उपलब्ध करून देत आहे. गेल्या महिन्यात म्हणजे जानेवारी महिन्यात पिठाचा तुटवडा इतका भीषण झाला होता की स्वस्तात पीठ घेण्याच्या प्रयत्नात ४ जणांना जीव गमवावा लागला होता. त्याच वेळी, पाकिस्तानमध्ये या आठवड्यातील महागाई दर ३८.४% पर्यंत वाढला आहे.

पाकिस्तानात पोलिस मुख्यालयावर दहशतवादी हल्ला

# पाच दहशतवादी ठार, पोलिस अधिकारी आणि रेंजरसह ४ जणांचा मृत्यू

**कराची : वृत्तसंस्था**

शुक्रवारी सायंकाळी काही दहशतवादी कराचीच्या शाहराह-ए-फैसल भागात असलेल्या पोलिस मुख्यालयात घुसले आणि त्यांनी गोळीबार सुरू केला. प्रत्युत्तरात पोलिसांनी केलेल्या कारवाईत ५ दहशतवाद्यांचा खात्मा केला. रात्री अकराच्या सुमारास ही चकमक संपली. अद्यापही शोधमोहीत राबवली जात आहे.

मीडिया रिपोर्ट्सनुसार, एक पोलीस अधिकारी आणि एका रेंजरसह चौघांना यामध्ये आपला जीव गमवावा लागला. तर १८ जण जखमी झाले आहेत. आता परिस्थिती नियंत्रणात असल्याचे पोलिसांनी सांगितले. धक्कादायक बाब म्हणजे पोलिसांच्या वेशात दहशतवादी पोलिस मुख्यालयात घुसले होते.

तत्पूर्वी, सिंधचे मुख्यमंत्री मुराद अली शाह यांनी संबंधित डीआयजींना आपापल्या भागातील कर्मचारी घटनास्थळी पाठवण्याचे निर्देश दिले. ते म्हणाले की, हल्लेखोरांना अटक झाली पाहीजे. मुख्यालयावरील हल्ला कोणत्याही किंमतीत खपवून घेतला जाणार नाही.

पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री बिलावल भुट्टो झरदारी म्हणाले की, सिंध पोलिसांनी नेहमीप्रमाणेच दहशतवादाचा धैर्याने सामना केला आहे. पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री बिलावल भुट्टो झरदारी म्हणाले की, सिंध पोलिसांनी नेहमीप्रमाणेच दहशतवादाचा धैर्याने सामना केला आहे. पाकिस्तानी मीडियानुसार, हा हल्ला संध्याकाळी ७:१० वाजता झाला. पोलिस आणि दहशतवाद्यांमध्ये सुमारे चार तास चकमक सुरू होती.

पाकिस्तानची स्वतःची दहशतवादी संघटना तहरीक-ए-तालिबान पाकिस्तानने (टीटीपी) या हल्ल्याची जबाबदारी घेतली आहे. टीटीपी ही पाकिस्तानातील सर्वात मोठी दहशतवादी संघटना आहे जी आपल्याच सरकारविरुद्ध लढत आहे.

# महिलांचे दागिने लांबवणारी आंतरजिल्हा टोळी लोणंद पोलिसांकडून जेरबंद

## चेन स्नॅचिंगचे १६ गुन्हे उघड

**सातारा : प्रतिनिधी**

लोणंद बस स्थानकामध्ये गर्दीचा फायदा घेऊन महिलांच्या गळ्यातील दागिने लांबवणाऱ्या आंतरजिल्हा टोळीला लोणंद पोलिसांनी जेरबंद केले या टोळीने एकूण दहा तोळे दागिने लांबवले असून दागिने व इनोवा कार असा १५ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या टोळीकडून १६ गुन्ह्यांचा पर्दाफाश करण्यात आला आहे.

लोणंद पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार लोणंद बस स्थानकावर महिला बसमध्ये चढताना गर्दीचा फायदा घेऊन वृद्ध महिलांच्या गळ्यातील दागिने चोरण्यात आल्याच्या असंख्य घटनांची नोंद लोणंद पोलीस स्टेशनमध्ये झाली होती. त्यानुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल वायकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपींनी वापरलेले इनोवा कार व त्यांची ओळख निष्पन्न केली होती. यामध्ये हौसाबाई नामदेव कांबळे वय ४५ राहणार उदगीर, गांधीनगर, जिल्हा लातूर, हरणाबाई बाबू सकट, वय ६५ आनंद नगर, देगलूर जिल्हा नांदेड, नर्सिंग कोंडीबा बने वय ३८ राहणार उदगीर, गांधीनगर, जिल्हा लातूर अशी आरोपींची नावे आहेत सदर आरोपी महिला इनोव्हा गाडीतून साताऱ्यात येऊन लोणंद बस स्थानकावर हे गुन्हे करीत असत याचप्रमाणे वाई, औरंगाबाद, कवठेमहांकाळ, सांगली शहर, नाशिक, ओतूर, लोणीकंद येथे विविध ठिकाणी त्यांनी अशा स्वरूपाची १६ गुन्हे केल्याचे कबूल केले आहे. या महिलांकडून एकूण दहा तोळे दागिने व इनोव्हा कार असा पंधरा लाख चाळीस हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या गुन्ह्याच्या तपासात विशाल वायकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गणेश माने, स्वाती पवार, संतोष नाळे, अतुल कुमार, श्रीनाथ कदम, सर्जेराव सुळ, अमोल पवार, फैया शेख, अभिजीत घनवट, अविनाश शिंदे, केतन लाळगे, प्रमोद शिरसागर, विजय शिंदे, विठ्ठल काळे, प्रिया दुर्गुडे, अश्विनी माने, उदगीर पोलीस स्टेशन लातूरकडून पोलिसा मतदार पुणे वाढ यांनी ही कारवाई केली या पथकाचे पोलीस अधीक्षक समीर शेख यांनी अभिनंदन केले आहे.

# स्पेशल फोर्स कमांडोनी देश सेवेसाठी सदैव समर्पित रहावे : कर्नल व्ही. बी. शिंदे

## २१ पॅरा स्पेशल फोर्स कमांडो युनिटचा ३८ वा वर्धापन दिवस वाई येथे साजरा

**वाई : प्रतिनिधी**

देश सुरक्षित असेल तर विकासाच्या दिशेने गतीने पुढे जात असतो. ज्या देशाच्या सीमा सुरक्षित तो देश सुरक्षित २१ पॅरा स्पेशल फोर्स कमांडो युनिटने ३८ वर्षांमध्ये अनेक स्पेशल ऑपरेशन यशस्वीरित्या पूर्ण केली. यावेळी काही शूरवीर देशासाठी शहीद झाले. देशाच्या सीमा बरोबर अंतर्गत सुरक्षा ही महत्त्वाची आहे. सेवानिवृत्तीनंतरही स्पेशल फोर्स कमांडोनी देश सेवेसाठी समर्पित राहावे असे मत २१ पॅरा स्पेशल फोर्स कमांडो युनिटचा ३८वा वर्धापन प्रसंगी मार्गदर्शन करताना कर्नल व्ही. बी. शिंदे यांनी व्यक्त केले.



कार्यक्रमामध्ये सुरवातीला छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून दीप प्रज्वलन केले त्यानंतर २१ पॅरा स्पेशल फोर्स कमांडोचे स्फूर्ती गीत व राष्ट्रगीत गाऊन कार्यक्रमाची सुरवात शहिदांना श्रद्धांजली अर्पण करुन केली. कार्यक्रमामध्ये वीर नारी, वीर माता-पिता, युद्धात विकलांग झालेल्या सैनिकांचा सन्मान चिन्ह देऊन सन्मान करण्यात आला तसेच युद्धामध्ये शौर्य चक्र धारक व पदक विजते यांचा हि सन्मान करण्यात आला. महाराष्ट्र व कर्नाटक राज्यातील तीनसे हुन अधिक माजी सैनिक एकत्र येऊन हा ऐतिहासिक कार्यक्रम साजरा केला आहे.

२१ पॅरा स्पेशल फोर्स कमांडो युनिटने १९९५ ते आत्तापर्यंत २८ वर्षाच्या कालखंडात वेगवेगळ्या ठिकाणी आतंकवादींशी झुंझ देऊन उत्तर पूर्व इलाखा शांती पूर्ण केला त्याबद्दल युनिटला तीन कीर्तीचक्र, सोळा शौर्य चक्र, एक शौर्य चक्रवार, दोन युद्ध सेवा मेडल सेना मेडल, ५४ विशिष्ट सेवा मेडल, तीन सेनाध्यक्ष, ७४ प्रशंसा पत्र, १४९ उप सेनाध्यक्ष प्रशंसा पत्र, १०४ पूर्वी कमान प्रशंसा पत्र, तीन पूर्वी कमान वायुसेना प्रशंसापत्र देऊन गौरविण्यात आले अशी माहिती सुभेदार मेजर भरत जाधव, सुभेदार गोरख ढमक यांनी दिली.

कार्यक्रमामध्ये मेजर आशिष अगरवाल, कॅप्टन लक्ष्मन माने यांनी पण आपले मनोगत व्यक्त केले कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सुभेदार मेजर भरत जाधव, सुभेदार शंकर हजारे, गोरख ढमक, प्रमोद घाडगे, नंदकुमार घोरपडे, हवालदार पांडुरंग आंबरे, आवासाहेब जगदाळे, बापूराव शेळके, विजय पाटील, संजय साळुंके, एम. डी. देवकर यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला २१ मराठा लाईट इनफंट्रीमध्ये काम केलेले सुबेदार मेजर ऑनरेरी व इतर माजी सैनिक सहकुटुंब उपस्थित होते.

# खंडोबाचा माळ येथील ट्रक चोरी प्रकरणी तिघेजण अटकेत

## सातारा शहर पोलिसांची सांगलीत कारवाई

**सातारा : प्रतिनिधी**

खंडोबाचा माळ येथून ट्रक चोरी केल्याप्रकरणी सातारा शहर पोलिसांनी तिघाजणांना अटक केली आहे. ही कारवाई सांगली शहरांमध्ये १२ फेब्रुवारी रोजी करण्यात आली.

याप्रकरणी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार दिनांक ३० जून २०२२ रोजी सातारा शहर परिसरातील खंडोबाचा माळ येथून अशोक लेलँड कंपनीचा तीन लाख रुपये किमतीचा ट्रक चोरी झाल्याची तक्रार शहर पोलीस ठाण्यात दाखल झाली होती. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस अधीक्षक समीर शेख यांनी सातारा शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक भगवान निंबाळकर यांच्याकडे दिला निंबाळकर यांनी गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पथकाच्या माध्यमातून या ट्रक चोरीची माहिती घेतली असता दोन चोरट्याने तो ट्रक सांगली येथील त्याच्या अन्य एका साथीदारासह बाहेर पाठवल्याची माहिती प्राप्त झाली त्या अनुषंगाने सातारा पोलिसांचा सांगली कोल्हापूर या ठिकाणी तपास सुरू असताना सदरचा चोरटा हा सराईत गुन्हेगार असल्याने तो वेळोवेळी पोलिसांना गुंगारा देत कर्नाटक गोवा अशा ठिकाणी वास्तव्य करीत होता दिनांक १२ फेब्रुवारी रोजी सांगली शहरात संबंधित चोरटा आली असल्याची माहिती शहर पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक अनिल वाघमोडे यांना प्राप्त झाली तात्काळ सातारा पोलिसांचे पथक तिकडे रवाना झाले आणि संबंधित चोराला चोरी केलेल्या ट्रक सह ताब्यात घेण्यात आले ट्रक चोरी प्रकरणांमध्ये सातारा शहर परिसरातील दोघांचा समावेश असल्याचे माहिती प्राप्त झाल्यानंतर त्या दोघांनाही अटक करण्यात आली.

समाधान पांडुरंग हातेकर व ३८ राहणार मंगळवार पेठ सातारा, आसिफ राजू शेख व ३९ राहणार सुतारवाडी तालुका मिरज जिल्हा सांगली, बशीर मजीत शेख वय ५५ राहणार गुरुवार पेठ सातारा अशी संबंधित आरोपींची नावे आहेत. या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक अनिल वाघमोडे उपनिरीक्षक सुधीर मोरे पोलीस हवालदार वी. आर. दळवी अब्दुल खलिफा अंबादास के. काटे संतोष कचरे यांनी भाग घेतला होता.

## महाबळेश्वर बस आगारातील पाणपोईची दूरवस्था

**महाबळेश्वर :** जगप्रसिद्ध पर्यटन स्थळ महाबळेश्वरला लाखो पर्यटक भेट देत असतात. महाबळेश्वर बस आगार मध्ये पर्यटकांना व नागरिकांना पिण्यासाठी पाणी मिळत नाही. ग्रामीण भागातून येणाऱ्या नागरिकांना महाबळेश्वर आगारात पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध नाही. प्रवेशांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन पाणपोई सुरू केली. मात्र पाणीपुरवठा नसल्याने ही पाणपोई बंद पडली आहे.

# डॉ. ऋतुजा जाधव यांचा जनरल सर्जरीमध्ये अरसिकॅान सुवर्णपदकाने गौरव

**कोरेगाव : प्रतिनिधी**

येथील कृष्णा विश्व विद्यापीठाची (पूर्वीचे कृष्णा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस) विद्यार्थिनी डॉ. ऋतुजा महादेव जाधव हिने मे, जून २०२२च्या एम.एस.(जनरल सर्जरी) परीक्षेमध्ये प्रथम क्रमांक संपादन केला. त्याबद्दल तिला विद्यापीठाच्या नुकत्याच पार पडलेल्या अकराव्या पदवीदान समारंभात प्रमुख पाहुणे ना. राधाकृष्ण विखे पाटील, महसूल,पशुसंवर्धन व दुग्ध विकास मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते अरसिकॅान सुवर्ण पदक, प्रमाणपत्र व रोख दहा हजार रुपये देऊन गौरवण्यात आले.




डॉ.ऋतुजा हिने तिचे एम. बी.बी. एस. चे शिक्षण ही याच विद्यापीठातून प्रथम श्रेणीत पूर्ण केले आहे. तिला वैद्यकीय संचालक डॉ. ए. वाय. क्षीरसागर, अधिष्ठाता डॉ. एस. टी. मोहिते, प्रशासकीय संचालक डॉ. आर. जी. नानिवडेकर, शस्त्रक्रिया विभागाचे तत्कालीन प्रमुख कै. डॉ. एस. आर. कुलकर्णी, शस्त्रक्रिया विभागाचे विद्यमान प्रमुख डॉ. एच. बी.जानुगडे, मार्गदर्शक डॉ. नितीन नांगरे, डॉ. आकाश काटकर आणि शस्त्रक्रिया विभागातील सर्व कर्मचारी यांचे बहुमोल मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

डॉ. ऋतुजा ही रहिमतपूर येथील सरदार बाबासाहेब माने महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. भाग्यश्री जाधव यांची सुकन्या आणि कै. प्रा. एम्. टी. जाधव (अतीत) यांची नात आहे.

हच्या या उज्ज्वल यशाबद्दल विद्यापीठाचे कुलपती डॉ. सुरेश भोसले, कुलगुरू डॉ. नीलम मिश्रा, कृष्णा सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ. अतुल भोसले, रहिमतपूर येथील पंचक्रोशी शिक्षण मंडळाच्या अध्यक्षा सौ. चित्रलेखा माने-कदम यांनी व या संस्थेतील अनेकांनी तिचे अभिनंदन केले आहे.

# भाजपाला मत म्हणजे दिवंगत लक्ष्मण जगताप यांना मत – खा. श्रीरंग बारणे

**पिंपरी : प्रतिनिधी**

चिंचवड विधानसभा मतदारसंघातील भारतीय जनता पार्टी, बाळासाहेबांची शिवसेना, आरपीआय (आठवले गट), रासप, शिवसंग्राम संघटना, रयत क्रांती संघटना, प्रहार संघटना या महायुतीच्या उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी बुधवारी (दि. १५) वाकड भागात नागरिकांशी संवाद साधला. त्यांच्या प्रचारासाठी बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे खासदार श्रीरंग बारणे हे सुद्धा प्रचारात मैदानात उतरले आहेत. चिंचवडमधील जनता सुज्ञ आहे. दिवंगत लक्ष्मण जगताप यांच्या विकासाला ते मत देतील आणि अश्विनी लक्ष्मण जगताप यांना एक लाखाच्या मताधिक्याने विजयी करतील, असा विश्वास खासदार बारणे यांनी व्यक्त केला.

यावेळी भाजपाच्या उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप, माजी उपममहापौर झामाबाई बारणे, नानी घुले, भाजपचे संघटन सरचिटणीस अमोल थोरात, शिवसेनेचे माजी नगरसेवक निलेश बारणे, सामाजिक कार्यकर्त्या करिष्मा बारणे, सुरेश राक्षे यांच्यासह भाजपा, बाळासाहेबांची शिवसेना, आरपीआय (आठवले गट), रासप, शिवसंग्राम संघटना, रयत क्रांती संघटना, प्रहार संघटना या महायुतीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, भाजपा आणि बाळासाहेबांची शिवसेना मजबुतीने राज्याच्या गाडा हाकत आहे. एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस सरकारने राज्यातील नागरिकांच्या हिताचे अनेक निर्णय घेतले आहेत. या मजबूत सरकारला आपलीही तेवढीच साथ मिळायला हवी. चिंचवड पोटनिवडणुकीतील भाजपा आणि मित्रपक्षाच्या उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप यांना मतदान करावे. अश्विनी जगताप यांना मत म्हणजे लक्ष्मण जगताप यांना मत असणार आहे. दिवंगत लक्ष्मण जगताप यांना श्रद्धांजली वाहण्याची हीच खरी वेळ आहे. जनतेने अश्विनी लक्ष्मण जगताप यांना विजयी करावे, असे आवाहन त्यांनी केले.



अश्विनी लक्ष्मण जगताप म्हणाल्या, माझ्या पतीची आज जयंती होती. त्यांच्या आठवणी कधीच माझ्या मनातून जाणार नाहीत. आज जयंती असूनही ते दुःख बाजूला सारून प्रचारात उतरले आहे. चिंचवड मतदारसंघातील जनतेने अखंडपणे ४० वर्षे माझ्या पतीवर भरभरून प्रेम केले. त्यांच्या विकासाचा वारसा पुढे घेऊन जायचा आहे. त्यासाठी तुम्ही सर्वांनी साथ द्यावी आणि भाजपाच्या कमळ चिन्हावर मतदान करून मला विजयी करावे, असे आवाहन त्यांनी केले.

# ‘हार्मनी २०२३’ वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

**अकलूज : प्रतिनिधी**

शिवरत्न शिक्षण संस्था संचलित शंकरराव मोहिते-पाटील इंग्लिश मिडीयम स्कुल, शिवरत्न सीबीएसई स्कूल, फ्री विंग्स या शाळांचा वार्षिक स्नेहसंमेलन हार्मनी २०२३ मोठ्या उत्साहात स्मृतिभवन अकलूज येथे पार पडला.

यात बालवाडी ते इयत्ता ९ च्या विद्यार्थ्यांनी विविध कलागुणांचे विविध कार्यक्रम सादर करून उपस्थित सर्वांचे मनोरंजन केले. या स्नेहसंमेलनाचे वेगळेपणा म्हणजे यात विद्यार्थ्यांच्या सोबत त्यांचे पालक देखील सहभागी झाले होते त्यांनी देखील नृत्य, गायण यात सहभाग होते आनंद लुटला.



या वर्षीचा शाळेतील स्टुडंट ऑफ द इअर म्हणून शिवरत्न स्कूलची विद्यार्थीनी कु.श्रृती नरवणे व शंकरराव मोहिते-पाटील इंग्लिश मिडीयम स्कुलचा विद्यार्थी चि. अथर्व थोरात यांना मिळाला,या वेळेस विविध प्रकारच्या बक्षीस वितरण सोहळा पार पडला.

या कार्यक्रमास संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष धैर्यशील मोहिते-पाटील,अध्यक्ष शितलदेवी मोहिते-पाटील, प्रसिद्ध अभिनेते अजय तपकिरे सचिव धर्मराज दगडे,संस्थेचे संचालक, प्रिन्सिपल अल्बर्ट थरकन, बिनो के पाऊलस शिक्षक,विद्यार्थी , पालक व इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# छत्रपती शिवरायांचे तख्त सातारकरांसाठी खुले

**सातारा : प्रतिनिधी**

छत्रपती शिवरायांच्या स्पर्शाने पावन झालेले सिंहासनावरील तख्त शिवजयंती दिनी १९ फेब्रुवारी रोजी शिवाजी संग्रहालयाच्या मुख्य दालनामध्ये सातारकरांसाठी करण्यात आले. विशेष प्रकाश योजनेमध्ये हे तख्त ठेवले गेले असून विद्युत रोषणाईने शिवाजी संग्रहालयाची इमारत झळाळून उठली. छत्रपती शिवरायांच्या तख्त आणि शिव प्रतिमेचे उद्घाटन सातारा जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष हरिश पाटणे व शहर पत्रकार संघाचे अध्यक्ष विनोद कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी माजी उपनगराध्यक्ष सुहास राजेशिर्के, छत्रपती शिवाजी संग्रहालयाचे सहाय्यक अभिरक्षक प्रवीण शिंदे, अपशिंगे येथील छत्रपती शिवाजी ज्युनिअर कॉलेजचे प्राध्यापक कापसे इं यावेळी उपस्थित होते.



छत्रपती शिवरायांच्या वापरातील हे तक्त ३४८ वर्ष जुने असून हे तख्त जरीचे आणि सोन्याच्या तारा पासून बनवलेले आहे. हे तख्त १९६९ मध्ये मुंबईच्या प्रिन्स ऑफ वेल्स संग्रहालयाकडून छत्रपती शिवाजी संग्रहालयाला प्राप्त झाल्याचे छत्रपती शिवाजी संग्रहालयाचे सहाय्यक अभिरक्षक प्रवीण शिंदे यांनी सांगितले. छत्रपती शिवरायांनी हे तख्त रायगड येथे वापरले शिवाय अजिंक्यतारा किल्ल्यावर छत्रपतींचे दोन महिने वास्तव्य होते त्यावेळी सुद्धा हे तख्त तिथे वापरले गेल्याची माहिती शिंदे यांनी दिली. या तख्ताला सोन्याच्या तारा आणि विशेष स्वरूपाचे जरी काम करण्यात आलेले आहे.